POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९४ ● मुंबई, रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईतील मुलुंड मेट्रो स्टेशनचे काम सुरु असताना स्लॅब कोसळला

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया



**'एकाचा दुर्दैवी मृत्यू'**

दरम्यान 'चौघेजण गंभीर जखमींपैकी त्यांना रुग्णालयात दाखल केलं असून एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच इतर तिघांवर उपासना मल्टिस्पेशलिटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत', अशी माहिती मुंबई महापौर रितू तावडे यांनी माहिती दिली.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईतील मुलुंड मेट्रो स्टेशनचे बांधकाम सुरु असताना एक दुर्दैवी घटना घडली. मेट्रो स्टेशनचा स्लॅब थेट वाहनांवर कोसळला, या घटनेत चौघेजण गंभीर जखमी झाले, यापैकी एकाचा अंत झाला. ही घटना शनिवारी 14 फेब्रुवारी रोजी घडली असून या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. अशातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी '७' ट्विटवर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

**देवेंद्र फडणवीस यांचं 'X' वरील ट्विट**

'मुंबईतील मुलुंड भागात मेट्रो बांधकामाचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून इतर काही जखमी झाले आहेत. या घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. मृताच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करेल. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी', अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. अशातच महापौर रितू तावडे यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

**मुंबई महापौर रितू तावडे यांची प्रतिक्रिया '**

'कामासाठी जे इंजिनियर्स ठेवले होते, त्यांनी कामावर लक्ष ठेवलं होतं का? या सगळ्याचीच प्रश्नचिन्हे या ठिकाणी उपस्थित होत आहेत. यापुढील वॉल बसवताना काळजी घेणं गरजेचं आहे, पण आता हे का झालं? याची कारणं आता शोधावी लागणार आहेत. या घटनेची संपूर्ण माहिती घेऊन मी तुम्हाला सर्व माहिती देते', असं त्या म्हणाल्या.

'हे एमएमराडीएचं काम असून एक निष्काळजीपणाचे लक्षण आहे. ज्यांनी कोणी संबंधितांनी हे कॉन्ट्रॅक्ट दिले, याची माहिती मला मॅडमकडूनच मिळाली की, कालच मॅरिफिट वॉलचे काम करण्यात आले होते. तसेच बॅरिकेट्स इतर सुरक्षिततेचा पाठपुरावा केला की नाही, जर नसेल केला तर रस्त्यावर सुरु असलेली वाहतूक त्यांनी थांबवणे गरजेचे होते'.

**'मुंबईतील लोकांची सुरक्षितता फार महत्त्वाचा विषय'**

'मुंबईचे इन्फ्रास्ट्रक्चर आपल्याला चांगलं करायचं आहे, त्याआधी आपल्या मुंबईतील लोकांची सुरक्षितता हा फार महत्त्वाचा विषय आहे. हे काम ज्यांना मिळतंय त्यांनी हे नियम फॉलो करावे अशी तरी माझी प्राथमिकता राहील', अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली.

## चार जण जखमी, एकाचा मृत्यू भयंकर व्हिडिओ समोर

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी मोठा अपघात झाला आहे. मेट्रो स्टेशनच्या पिलरमधील सिमेंटचा भाग उंचावरुन खाली कोसळल्याने दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. पूर्व उपनगरातील मुलुंड येथे पिलरचा भाग एका रिक्षावर कोसळून तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी जमा झाली. मेट्रोचा पिलर खाली कोसळून झालेल्या अपघातानंतरचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे.



**नेमकं काय घडलं?**

मुलुंड येथे मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी सिमेंटच्या पिलरचा भाग कोसळला. शनिवार १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मुलुंड पश्चिम भागातील लाल बहादूर शास्त्री रोडवर जॉनसन अँड जॉनसन कंपनीच्या जवळ मुंबई मेट्रोचे बांधकाम सुरु असताना हा प्रकार घडला.

**कसा झाला अपघात?**

एलबीएस मेट्रो स्थानकाच्या बांधकामादरम्यान सिमेंटच्या खांबाचा एक भाग कोसळून खालून जाणाऱ्या रिक्षावर पडला. यावेळी रिक्षातून प्रवास करणारे चालकासह तीन ते चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो कर्मचारी, वॉर्ड कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका सेवा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. रिक्षा पिलरखाली दबल्यामुळे एक जण काही काळ अडकून पडला होता. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने स्लॅब हटवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. यावेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाल्याचं पाहायला मिळालं.

**मेट्रो मार्ग चारवर अपघात**

मुंबई मेट्रो ४ या वडाळा-घाटकोपर-मुलुंड-कासारवडवली मार्गे जाणाऱ्या ग्रीन लाइनवरील स्टेशनच्या बांधकामावेळी हा अपघात झाला आहे. ३२.३२ किमीचा एलिवेटेड कॉरिडोअर मुलुंडसह भांडुप, कांजुरमार्ग या एलबीएस रोडवरील स्थानकांची कनेक्टिव्हिटी वाढवत मुंबईतील महत्वपूर्ण व्यावसायिक भागांशी जोडेल. यामुळे मुंबई लोकलवरील ताण कमी होणार

## शाळेच्या स्नेहसंमेलनात पाकिस्तानी देशभक्तीपर गाण्यावर नृत्य केल्याचा आरोप...

### भाजप नेत्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल!

■**म्यवतमाळ। प्रतिनिधी,**

यवतमाळच्या उमरखेड तालुक्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यवतमाळच्या उमरखेडमधील एका शाळेत आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनात पाकिस्तानी देशभक्तीपर गाण्यावर नृत्य करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित घटना ही २६ जानेवारी रोजी यवतमाळ जिल्ह्यातील उमरेखेडमधील अब्दुल गफूर शाह नगरपरिषद उर्दू शाळा क्रमांक २ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमादरम्यान घडली.



या प्रकरणासंबंधी भारतीय जनता पक्षाचे नेते गोपाल कलाणे यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याची माहिती आहे. संबंधित तक्रारीच्या आधारे, उमरखेड पोलिसांनी 12 फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास शाळेचे मुख्याध्यापक आणि एका शिक्षकाविरुद्ध भारतीय दंड संहिता, २०२३च्या कलम १९६(१)(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शाळेचे मुख्याध्यापक संचार उल्ला खान अब्दुल खान आणि शिक्षक मोहम्मद फरोज आशा अशी अटक केलेल्या व्यक्तींची ओळख समोर आली आहे.

**देशद्रोहाच्या श्रेणीत असल्याचा आरोप...**

तक्रारीनुसार, शाळेच्या स्नेहसंमेलनात "ये मर्द ये मुजाहिद, तेरी अलगर क्या है" हे गाणं गायले गेलं आणि त्यावर नृत्य करण्यात आलं. हे गीत पाकिस्तानमध्ये लष्करी प्रेरणादायी गीत म्हणून ओळखले जात असून ते तिथे देशभक्तीच्या भावना जागृत करतं. गोपाल कलाणे यांच्या आरोपानुसार, शाळेच्या कार्यक्रमात अशा पाकिस्तानी गाण्याचं गायन आणि त्यावर नृत्य करणं हे अनेक नागरिकांच्या भावना दुखावणारं कृत्य असून ते देशद्रोहाच्या श्रेणीत येतं.

भाजप नेत्यांनी केलेल्या तक्रारीनुसार, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या घटनेमुळे स्थानिक पातळीवर निषेधाची लाट उसळली आहे आणि सोशल मीडियावर देखील तीव्र प्रतिक्रिया उमटत असल्याचं पाहायला मिळत. आहे. उमरखेड पोलिसांनी संबंधित प्रकरणाबाबत गुन्हा दाखल करून त्याचा तपास सुरू केला आहे.

## वर्गशिक्षकाकडून ४ विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार

# नराधम न्यायालयाजवळ पोहोचताच महिलांनी झोडपलं

**विद्यार्थीनींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह**

दरम्यान, संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत यापूर्वीही पालकांनी वारंवार तक्रारी केल्याची माहिती समोर आली आहे. एवढी मोठी संस्था असूनही शाळेत वॉचमन नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी थेट रस्त्यावर पळत सुटतात. शेजारील जिजामाता चौकात मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने लहान-मोठे अपघात घडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. याबाबत पालकांनी शालेय प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे श्रीरामपूरसह राज्यभरात संताप व्यक्त केला जात असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

■**श्रीरामपूर। प्रतिनिधी,**

शहरात शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका शाळेतील वर्गशिक्षकाने चार विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून, या प्रकरणाने शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपी शिक्षकाला तात्काळ अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्याला ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळलीये. नराधमाला न्यायालयात नेताना महिलांनी त्याच्या कानशिलात लगावलीये.



मिळालेल्या माहितीनुसार, एका विद्यार्थिनीने घडलेला प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली. त्यानंतर संबंधित शिक्षकाने आणखी तीन ते चार विद्यार्थिनींसोबत गैरकृत्य केल्याचे समोर आले. या तक्रारीनंतर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात लैंगिक अत्याचार तसेच पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन गोणारकर असे अटक करण्यात आलेल्या आरोपी शिक्षकाचे नाव असून, पोलिसांनी त्याला तात्काळ गजाआड केले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, संबंधित शिक्षकाने यापूर्वीही असे प्रकार केले आहेत का, याची महिला अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

या घटनेमुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, मुलींच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रातच अशा प्रकारची घटना घडल्याने समाजमन हादरले आहे.

## महाराष्ट्रातलं असं एक गाव जिथं आंतरजातीय विवाह थाटात लावले जाणार!

### 'जातमुक्ती'साठी ऐतिहासिक निर्णय

■**अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

अहिल्यानगर जिल्ह्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीने जातमुक्त गावाची घोषणा केली आहे.. आमच्या गावात जातींवरुन भेद केला जाणार नाही, आंतरजातीय विवाह थाटात लावले जातील, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या सोशल मीडियावरील संदेशांना गावकरी थारा देणार नाहीत, असा ठरावच सौंदाळा ग्रामस्थांनी एकमुखाने संमत केलाय.. दरम्यान, याशिवाय जातमुक्तीसाठी आणखी कोण-कोणते निर्णय ग्रामस्थांनी एकमताने मंजूर केले आहेत? सरपंचांना याबाबत काय वाटतं? ते जाणून घेऊयात..

नेवासा तालुक्यातील सौंदाळा गाव नेहमी समाज हिताचे निर्णय घेत असते.. त्यामध्ये शिवी बंदी, विधवा पुनर्विवाह, विद्यार्थी आणि गावाच्या हिताचे वेगवेगळे ठराव सौंदाळा ग्रामपंचायत मार्फत आजवर घेतले गेले आहेत.. याच सौंदाळा गावाने आता जात हद्दपार करण्याचा निर्णय घेतला



आहे.. सरपंच शरद आरगडे यांनी ग्रामसभेत जातमुक्त गावचा ठराव मांडला आणि संपूर्ण गावाने या ठरावाला एकमुखी पाठिंबा दिला.. या ठरावानुसार सौंदाळा गावामध्ये यापुढे आंतरजातीय विवाह केले जातील.. जात, पंथ, धर्म, वंशाच्या आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही.. गावातील सर्व नागरिक समान असून, 'माझी जात-मानव' ही भावना स्वीकारण्यात येत आहे.. सार्वजनिक ठिकाणे, शासकीय योजना, ग्रामपंचायत सेवा, सामाजिक-धार्मिक कार्यक्रम, विवाह, सण-उत्सवात जातिभेद केला जाणार नाही...गावातील कुणीही सोशल मीडियावर जातिभेद करणारे मेसेज करणार नाही आणि तसे आढळल्यास ठरावानुसार संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे..

सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे याबाबत बोलताना म्हणाले, "आम्ही ग्रामसभेत जातमुक्त गावाची घोषणा केलीये. ग्रामसभेमध्ये सवार्नुमते हा ठराव मंजूर झालाय. शाळेत प्रत्येकाने भारत माझा देश आहे, आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत, ही प्रतिज्ञा म्हटलेली आहे. मात्र, आता दैनंदिन जीवनात पाहिलं तर प्रत्येक जाती-पातीत वाटल्या गेल्याचं चित्र पाहायला मिळतंय. जातीभेद सुरु झालाय, हे कुठेतरी थांबलं पाहिजे. मानव जात ही खरी जात आहे. जरी समाज आरक्षण वगैरे काही विषय असतील, तरी जात कागदापुरती मर्यादित असावी. ती माणुसकीमध्ये नसावी. दैनंदिन जीवन जगताना कुठेही जातीची गरज भासत नाही. एखाद्यावर संकट येतं, तेव्हा कोण कोणाची जात पाहात नाही. अशी परिस्थिती असताना कुठेतरी निवडणूक लागली की जात दिसते. अशा गोष्टी लक्षात येतात तेव्हा वाटतं, उपचारापेक्षा प्रतिबंध बरा. गावप्रमुख म्हणून आपली ती जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही आधी ग्रामस्थांची चर्चा केली. ग्रामसभेत हाच विषय ठेवला होता.

नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठल लंघे याबाबत बोलताना म्हणाले, संपूर्ण राज्याला दिशादर्शक असा निर्णय नेवासा तालुक्यातील आमच्या सौंदाळा ग्रामपंचायतीने घेतलाय. जातमुक्त गाव आम्हाला करायचं आहे. पूर्वीच्या रुढी-परंपरा चालत आल्या होत्या. नवीन पिढीने त्याला फाटा दिलेलाच आहे. सर्वांनी एकत्र येऊन प्रगतीकडे जावं, यासाठी हे घेतलेले निर्णय आहेत. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे, हीच भावना आहे.

# ठाकरे गटाच्या उप-तालुकाप्रमुखाच्या शेतात अफूची शेती

### ७२ लाख रुपये किमतीची अफूची झाडे जप्त



■**धाराशिव। प्रतिनिधी,**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपतालुकाप्रमुखाने कांदा पिकामध्ये बेकायदेशीररीत्या अफूची लागवड केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या कारवाईत ४८५ किलो ६५० ग्रॅम वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून, याची अंदाजे किंमत ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये इतकी आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी वाशी तालुक्यातील मौजे दशमेगाव शिवारात एका शेतात लपूनछपून अफूची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सर्व्हे क्रमांक १६३, मौजे दशमेगाव येथे पाहणी केली असता कांदा पिकाच्या आंतरपिकामध्ये मोठ्या प्रमाणात अफूची लागवड आढळून आली. सदर अफूच्या झाडांना पांढऱ्या व गुलाबी रंगाची फुले तसेच मोठी बोंडे असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. हे शेत समाधान मनोहर उघडे (रा. दशमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांचे असल्याचे निष्पन्न झाले असून, आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी त्यांनीच ही लागवड केल्याची माहिती पोलिसांना दिली. नायब तहसीलदार वाशी व दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत ही अफूची झाडे जप्त करण्यात आली.



या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ कलम ८ (क) व १८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार व वाशी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

**ओमराजे निंबाळकरांच्या भूमिकेकडे लक्ष**

धाराशिवचे ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर हे गेल्या काही काळापासून जिल्ह्यात अवैध व्यवसाय, दोन नंबरचे धंदे आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या विरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. विशेषतः तुळजापूर येथील भाजपाचे पदाधिकारी व तत्कालीन नगराध्यक्ष विनोद उर्फ पिंटू गंगणे यांच्या कथित ड्रग्जप्रकरणातील सहभागावरून ओमराजे निंबाळकर यांनी जाहीरपणे तीव्र विरोध दर्शवला होता. त्या वेळी त्यांनी आपल्या भाषणांत सांगितले होते की, दोन नंबर काम करणाऱ्या, समाजविघातक कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांना राजकारणात स्थान देऊ नका. आम्ही फक्त स्वच्छ चारित्र्याच्या लोकांनाच राजकारणात सोबत घेतो. मात्र आता त्यांच्याच पक्षाच्या वाशी उपतालुकाप्रमुखाच्या शेतात मोठ्या प्रमाणात अफूची शेती आढळून आल्याने राजकीय वतुर्ळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे अवैध व्यवसायांविरोधात ओमराजे निंबाळकर रान उठवत असतानाच, दुसरीकडे त्यांच्या पक्षातील पदाधिकाऱ्यावर इतका गंभीर गुन्हा उघडकीस आल्याने या प्रकरणात ओमराजे निंबाळकर काय भूमिका घेतात, पक्षांतर्गत कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे विशेषतः वाशी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## पुण्यात इलेक्ट्रिक बसला भीषण आग... सुदैवाने जीवितहानी टळली

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुण्याच्या चाकण औद्योगिक वसाहतीत शुक्रवारी दुपारी ह्यपीएमपीएमएलह्णच्या एका धावत्या इलेक्ट्रिक बसला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. निगडीहून महाळुंगे एमआयडीसीकडे कामगारांना घेऊन जाणाऱ्या या विशेष बसमध्ये साधारण ५० प्रवासी प्रवास करत होते. महिंद्रा कंपनीसमोरून ही बस जात असताना अचानक बसच्या मागील भागातून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच ज्वाळा उसळू लागल्या. सुदैवाने, बसचालकाने तत्काळ प्रसंगावधान राखत बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि वाहकाच्या मदतीने सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.



शॉर्ट सर्किट किंवा बॅटरी यंत्रणेतील बिघाडामुळे ही आग लागली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि जवानांनी आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले, मात्र तोपर्यंत ही लाखो रुपयांची बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. काही प्रवाशांना धुरामुळे थोडा त्रास झाला असला तरी, कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. या घटनेमुळे चाकण परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, या घटनेने सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. गेल्या वर्षभरात पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात 'पीएमपीएमएल' बसेसना आग लागण्याच्या किमान १० ते १२ घटना समोर आल्या आहेत. कधी इंजिन गरम होणे तर कधी बॅटरीमधील बिघाड ही कारणे प्रशासनाकडून दिली जातात, परंतु प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या तांत्रिक चुकांना जबाबदार कोण, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. प्रशासनाचा देखभाल-दुरुस्तीचा अभाव की कंत्राटदारांचा निष्काळजीपणा, यावरून संताप व्यक्त केला जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# शिक्षण जिहाद!



गुजरात येथे एका शाळेत पूर्वपरीक्षेला विलंबा आलेला इयत्ता १२ वीचा विद्यार्थी महंमद खान अन्सारी (वय १८ वर्षे) याला शिक्षिकेने विलंबाचे कारण विचारले. त्याने उत्तर देणे तर दूरच; पण शिक्षिकेच्या कानशिलात लगावली. 'मला घरी कधी कुणी काही विचारत नाही. तुम्ही मला प्रश्न विचारणारे कोण?', अशा आविर्भावात तो शिक्षिकेशी बोलत होता. त्यानंतर शिक्षिकेला धक्का देऊन तो पळून गेला. त्याच्या पालकांना याविषयी सांगितल्यावर त्यांनी शिक्षिका आणि मुख्याध्यापक यांची क्षमा मागितली खरी; मात्र नंतर महंमदने त्याच्या वडिलांसह आणखी १५ ते २० जणांना शाळेत आणले. या वेळी त्याने शिक्षिकेला 'तू या शहरात एकटीच रहातेस. त्यामुळे तू स्वतःची काळजी घेतली पाहिजेस', अशी धमकी दिली. या प्रकरणी खान याच्यासह ३ जणांना अटक करण्यात आल्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन दिला. ज्या शिक्षकांसमोर हात जोडले गेले पाहिजेत, तोच हात शिक्षिकेवर उगारला जातो, त्यांना धमकी दिली जाते, या घटना कायदेशीर गुन्हाच आहेत; पण त्यातील आरोपींना सहजपणे जामीन मिळतो. यातून अशांच्या विरोधात कठोर कायद्यांची अपरिहार्यता लक्षात येते. संपूर्ण प्रकरण पाहिले, तर यातून विद्यार्थ्यांचा उर्मटपणा दिसून येतो; पण केवळ तेवढ्यापुरताच विचार न करता ही घटना शिक्षणव्यवस्था, पालकत्व, कायदा-सुव्यवस्था आणि धर्मांधांची मनोवृत्ती यांचाही विचार करण्यास प्रवृत्त करणारी आहे. शाळेला 'ज्ञानमंदिर' मानले जाते. मग वरील प्रकार म्हणजे ज्ञानमंदिराचा अवमान नव्हे का? ही घटना शिक्षणक्षेत्राला काळिमा फासणारी आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या चारित्र्यविकासाचे खरे शिल्पकार असतात. विद्यार्थ्यांना घडवणे, त्यांना शिस्त लावणे, संवादाची पद्धत शिकवणे, हे दायित्व शिक्षकांचेच; परंतु वरील घटना पहाता 'आज कोण कुणाला शिकवत आहे?', तेच कळत नाही. शिक्षिकेने केवळ विलंबाचे कारण विचारले, तर त्यात बिघडले कुठे? तो महाभयंकर अपराध कसा होऊ शकतो? शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते परस्परपूरक असावे. त्यात आदर आणि विश्वास असावा. अर्थात् या गोष्टी केवळ सांगण्यासाठी असतात, कृतीत आणण्यासाठी नसतात, हे विशिष्ट धर्माचे लोक प्रामुख्याने अशा घटनांमधून दाखवून देत आहेत. वरील घटनेकडे केवळ 'शिक्षक-विद्यार्थी' या भूमिकेतून न पहाता 'शिक्षक आणि मुसलमान विद्यार्थी' या दृष्टीने पहायला हवे. 'प्रत्येक वेळी धर्माचा रंग मध्ये आणू नका', ही ओरड करणारे अशा घटनांविषयी मात्र काहीच बोलत नाहीत, हे लक्षात घ्या! अशा घटनांना विशिष्ट धर्मीयच जर उत्तरदायी असतील, तर त्या धर्माचा रंग मध्येच आणण्याला आक्षेप का? एकतर स्वतः विलंबाने यायचे आणि त्याविषयी विचारल्यावर हात उगारायचा, ही कुठली पद्धत? अशांना ना शिक्षकांविषयी कसले देणेघेणे आहे, ना त्यांच्याप्रती आदर! त्यामुळे 'प्रत्येक ठिकाणी आपलीच सत्ता, अशा आविर्भावात ते वागतात. ही वृत्ती अगदी लहानवयातील मुसलमान बालकांपासून मोठ्या वयाच्या धर्मांध मुसलमानांमध्ये मुरलेली असते. शिक्षकेवर हात उगारला जातो, यातूनच 'धर्मांध मुसलमान किती असहिष्णु आहेत', हे लक्षात येईल. 'भारतात मुसलमान असुरक्षित आहेत; भारतात रहाणे मुसलमानांसाठी धोक्याचे आहे', असे म्हणणारे आता कोणत्या बिळात जाऊन लपले आहेत? 'भारतात कोण असुरक्षित आहे?', याचे उत्तर त्यांनी द्यावे. 'शिस्त', 'नियम', 'बंधन' हे शब्द जणू आमच्यासाठी नाहीत', असा उद्दामपणा धर्मांध मुसलमानांच्या नसानसांत भिनला आहे. त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य कुणी हिरावून घेण्याचा जरासा प्रयत्न केला, तरी ते लगेच हिंसक होतात. स्वतःचे दायित्व झुगारून द्यायचे आणि आक्रमक व्हायचे! असे केले की, समोरचा मुकाट गप्प बसतो. हे तंत्र त्यांना चांगलेच अवगत झाले आहे. त्यामुळेच तर 'हिंदूबहुल भारतात हिंदू नव्हे, तर अल्पसंख्य धर्मांधच राज्य करत आहेत', असे वाटते. ही हिंदूंसाठी धोक्याची घंटा आहे. हिंदूंनी वेळीच शहाणे व्हायला हवे. हिंदू धर्म नेहमीच गुरुजन वर्गाविषयी आदर बाळगण्यास शिकवतो. कुणी तसा प्रयत्न केला, तरी हिंदू पालक विद्यार्थ्यांना योग्य ती समज निश्चितच देतात. हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य आहे. येथे तर मुसलमान विद्यार्थ्याने जे केले, 'ते कसे योग्य आहे? त्याच्यावर किती अन्याय झाला?', अशी ओरड करायला मुसलमान नेहमी सिद्धच असतात. त्यामुळे त्याच्या समवेत शाळेत जाणे, त्यांची बाजू उचलून धरणे, त्यांच्या भूमिकेचे समर्थन करणे, हे पालकांकडून ओघाने केले जाते. विद्यार्थ्याने शिक्षिकेला दिलेल्या धमकीतून धर्मांध मुसलमानांची स्त्रीविरोधी मानसिकता दिसून येते. धर्मांधांच्या लेखी स्त्रियांना शून्य किंमत असते, हे पुन्हा एकदा या उदाहरणातून सिद्ध झाले. 'कोणत्याही स्त्रीने आपल्याला कसलीही आडकाठी आणू नये किंवा विरोध करू नये, बंधने घालू नयेत', असेच त्यांना नेहमी वाटते. कुणी तसा प्रयत्न केलाच, तर त्यांना धर्मांध मुसलमानांच्या हाणामारीची शिकार व्हावीच लागते. त्यांच्या क्रूर मानसिकतेचा सामना करावा लागतो. हिंदू स्त्रियांनी खऱ्या अर्थाने सक्षम, कणखर आणि खंबीर व्हावे. स्वतःतील 'रणरागिणी'ला जागृत करून जिहादी मनोवृत्ती असणाऱ्यांचा प्रतिकार करावा! काही वर्षांपूर्वी देहलीतील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापिठामध्ये दिवाळी साजरी करणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांना मुसलमान विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला होता. हिंदूंनी लावलेले दिवे धर्मांधांनी लाथेने उडवून दिले, तसेच रांगोळी पुसून टाकली, तसेच ऐन दीपोत्सवात 'अल्ला हू अकबर' (अल्ला महान आहे) 'नारा-ए-तकबीर' (अल्ला सर्वात मोठा आहे), 'फॅलेस्टाईन झिंदाबाद', अशा घोषणा दिल्या. जे देहलीत घडले, त्याचीच पुनरावृत्ती गुजरातमध्ये वेगळ्या पद्धतीने झाली आहे. ठिकाण जरी वेगळे असले, तरी मानसिकता विद्वेषीच आहे. शिक्षण संस्थांमध्ये होणारे हे प्रकार म्हणजे तेथे जिहाद घडवण्याचा धर्मांध मुसलमानांचा डाव नसेल कशावरून? शिक्षण जिहाद वेगवेगळ्या माध्यमातून अस्तित्वात आहेच. तो वाढवणाऱ्या धर्मांध मुसलमानांना वेळीच वेसण घालायला हवी, अन्यथा शिक्षण क्षेत्राचे इस्लामीकरण झाल्यास भारतीय हिंदू काय करणार आहेत?

# थायलंडमध्ये आली लोकशाहीवादी लाट

थायलंडच्या सार्वत्रिक निवडणुकीत राजकीय भूकंप झाला आहे. पुआ थाई यांचा वरचष्मा की लोकशाहीवादी लाटेचे पुनरागमन? असा प्रश्न उपस्थित होत आहे. भारतासाठीही हे निकाल महत्त्वाचे आहेत.



आग्नेय आशियातील अत्यंत महत्त्वाचा देश असलेल्या थायलंडमध्ये झालेल्या निवडणुकांनी जागतिक राजकारणाचे लक्ष वेधून घेतले आहे. लष्करशाहीचा प्रभाव, राजेशाहीचे अस्तित्व आणि जनतेची लोकशाहीसाठीची ओढ या त्रिकोणी संघर्षात मतदारांनी कौल दिला. थायलंडच्या राजकारणात गेल्या दोन दशकांपासून लष्करी पाठबळ असलेले गट आणि लोकशाही समर्थक पक्ष यांच्यात जोरदार संघर्ष सुरू आहे. २०२३ च्या निवडणुकीत 'मूव्ह फॉरवर्ड पार्टी'ने सर्वाधिक जागा जिंकूनही त्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या राजकीय उलथापालथी महत्त्वाच्या ठरल्या.

**यंदाच्या निवडणुकीत प्रामुख्याने काही गट आमनेसामने होते.**

१. सत्ताधारी अनुतिन चर्नविराकुल यांच्या नेतृत्वाखालील भुमजाईथाई पक्ष.
२. पुआ थाई. शिनवात्रा कुटुंबाचा प्रभाव असलेला आणि सध्या सत्तेत असलेला पक्ष.
३. लोकशाहीवादी गट. अर्थात पीपल्स पार्टी. माजी 'मूव्ह फॉरवर्ड पार्टी'चा नवा अवतार, जो तरुणांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे.
४. लष्करी समर्थक गट. जुन्या लष्करी राजवटीशी संबंधित असलेले पक्ष.

थायलंडच्या भविष्यासाठी दोन पूर्णपणे भिन्न विचारसरणींमध्ये निवडणुकीत लढत झाली. एकीकडे राष्ट्रवाद, राजेशाहीचा आदर आणि यथास्थिती टिकवून ठेवणारा गट, तर दुसरीकडे बदल आणि खऱ्या लोकशाहीचे आश्वासन देणारा गट. सर्वांना चकित करत राष्ट्रवादी विचारसरणीचा विजयी झाला आहे. पंतप्रधान अनुतिन चर्नविराकुल यांच्या नेतृत्वाखालील 'भुमजाईथाई' पक्षाने प्रगतशील चळवळीला मागे टाकत यश मिळविले आहे. अनेक वर्षांनंतर थायलंडच्या मतदारांनी बदलापेक्षा 'स्थिरते'ला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट होते. निवडणुकीच्या अवघ्या काही महिने आधी थायलंड आणि कंबोडियामध्ये सीमावादावरून भीषण संघर्ष झाला होता. अनुतिन चर्नविराकुल यांनी या संघषार्चा राजकीय फायदा उठवत सुरक्षेचा मुद्दा प्रचारात आणला. "कंबोडियाने एक रॉकेट डागले, तर आम्ही १०० पाठवू," असे खळबळजनक विधान करत त्यांनी सीमाभिंत बांधण्याचे आश्वासन दिले, तर सिंगापूरमधील तज्ज्ञांच्या विश्लेषणानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनिश्चित परराष्ट्र धोरणामुळे थायलंडच्या जनतेत चिंतेचे वातावरण होते. अशा काळात जनतेने सुधारणांपेक्षा स्थिरता आणि सातत्य देणाऱ्या नेत्याला पसंती दिली.

भुमजाईथाई पक्षाकडे स्पष्ट बहुमत नसले, तरी त्यांना सरकार स्थापनेत फारशी अडचण येणार नाही. कारण, थायलंडच्या संसदेतील वरिष्ठ सभागृह हे भुमजाईथाईच्या मित्रपक्षांनी भरलेले आहे. गेल्या पाच महिन्यांपासून अल्पमतातील सरकारचे पंतप्रधान म्हणून काम पाहणाऱ्या अनुतिन यांना आता दोन्ही सभागृहांवर पूर्ण नियंत्रण मिळण्याची शक्यता आहे. थायलंडचा हा निकाल देशाच्या राजकारणात जुना रक्षक पुन्हा शक्तिशाली झाल्याचे दर्शवतो. नागरी सेवक, लष्करी अधिकारी आणि राजेशाही समर्थकांनी एकजुटीने भुमजाईथाईला पाठबळ दिले. कृती करणारा माणूस अशी अनुतिन यांची प्रतिमा त्यांना सत्तेच्या शिखरावर घेऊन गेली आहे.

सुमारे ५०० सदस्यीय प्रतिनिधी सभेत आगामी सरकार आघाडीच्या स्वरूपातच सत्तेत येण्याची शक्यता आहे. पुआ थाई पक्षाच्या जागांमध्ये झालेली घट चिंतेचा विषय आहे. दुसरीकडे, पीपल्स पार्टीने शहरी भागात आणि तरुण मतदारांमध्ये प्रचंड मुसंडी मारली आहे. ग्रामीण भाग अजूनही पुआ थाईच्या पाठीशी उभा असल्याचे दिसते, परंतु शहरांमधील रोष हा लष्करी हस्तक्षेप आणि संथ अर्थव्यवस्थेमुळे वाढत आहे.

हा निकाल अनेक अर्थांनी महत्त्वाचा मानला जात आहे. मागील निवडणुकांमध्ये युवकवर्ग, शहरी मतदार आणि मध्यमवर्गीय समाजाने प्रगतमतवादी व सुधारणावादी पक्षांना पाठिंबा दिला होता. मात्र यावेळी ग्रामीण भाग, पारंपरिक मतदार आणि सुरक्षा व स्थैर्याला प्राधान्य देणाऱ्या वर्गाने भुमजाईथाई पक्षाकडे झुकते माप दिल्याचे स्पष्ट दिसते. गेल्या वेळी सर्वाधिक जागा मिळवूनही सत्तेत न बसू शकलेल्या गटाबद्दल मतदारांमध्ये सहानुभूती होती, जी निकालातून स्पष्टपणे दिसून आली. तसेच, पर्यटन क्षेत्रावरील अवलंबित्व, सीमावर्ती सुरक्षेचे प्रश्न आणि जागतिक भू-राजकीय अस्थिरता हे अत्यंत कळीचे मुद्दे महत्त्वाचे ठरले.

थायलंडच्या संविधानातील तरतुदींनुसार, केवळ कनिष्ठ सभागृहातील जागा जिंकून चालत नाही, तर सिनेटचा (लष्कराने नियुक्त केलेली सभा) पाठिंबा मिळवणेही पंतप्रधान निवडीसाठी महत्त्वाचे असते. निकालानंतर असे दिसते की, भुमजाईथाई पक्षाला पुन्हा एकदा सत्ता स्थापन करण्यासाठी इतर लहान पक्षांशी किंवा लष्करी पाठबळ असलेल्या गटांशी हातमिळवणी करावी लागेल. जर त्यांनी लोकशाहीवादी पीपल्स पार्टीशी हातमिळवणी केली, तर ते थायलंडच्या लोकशाहीसाठी एक मोठे पाऊल ठरेल. मात्र, जुन्या लष्करी गटांशी केलेली युती जनतेमध्ये असंतोष निर्माण करू शकते.

गेल्या दोन दशकांपासून लष्करी हस्तक्षेप, घटनात्मक बदल, प्रगतमतवादी चळवळी आणि राजकीय अस्थिरतेचा अनुभव घेतलेल्या थायलंडने यावेळी तुलनेने संरक्षणवादी व सत्तास्थापित राजकीय शक्तींना कौल दिला. या निकालांचे पडसाद केवळ थायलंडपुरते मर्यादित न राहता संपूर्ण आशियान प्रदेशाच्या राजकारणावर आणि सामरिक समतोलावर उमटण्याची शक्यता आहे. प्रगतमतवादी विचारसरणीला अजूनही संस्थात्मक अडथळे पार करावे लागत असल्याचे हे द्योतक आहे.

निवडणूक निकालानंतर थायलंडच्या शेअर बाजारात स्थैर्याचे संकेत दिसले. गुंतवणूकदारांनीही सकारात्मक प्रतिक्रिया दिली, नव्या सरकारकडून धोरणात्मक सातत्याची अपेक्षा आहे. त्यात सार्वजनिक कर्ज, युवकांमधील बेरोजगारी, डिजिटल अर्थव्यवस्थेतील स्पर्धा आणि हवामान बदलाचे परिणाम आदींचा समावेश आहे. प्रादेशिक पातळीवर पाहता, थायलंडचा हा कौल आशियान गटातील संरक्षणवादी प्रवाहाशी सुसंगत आहे. निकालानंतर आता सर्वांचे लक्ष आघाडी सरकारच्या रचनेवर केंद्रित झाले आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर घटनात्मक सुधारणांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येण्याची शक्यता असली, तरी त्याची गती मंद असेल, हे स्पष्ट आहे. प्रगतमतवादी पक्ष विरोधी बाकावरून दबाव कायम ठेवतील, तर सरकार स्थैर्य आणि विकास यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करेल.


थायलंड हा भारताचा 'ॲक्ट ईस्ट' धोरणातील एक महत्त्वाचा भागीदार आहे. थायलंडमध्ये स्थिर सरकार असणे भारताच्या व्यापार आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक आहे. भारत-म्यानमार-थायलंड त्रिपक्षीय महामार्ग आणि बिमस्टेक यांसारख्या संघटनांमधील सहकार्यासाठी थायलंडमधील नवीन सरकारची भूमिका निर्णायक ठरेल.

थायलंडच्या निवडणूक निकालांनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, लोकशाही ही केवळ बदलाची आकांक्षा नसून सुरक्षिततेचा शोधही आहे. आगामी काळात थायलंडची वाटचाल ही आशियातील लोकशाही, सुरक्षा आणि विकास यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्याचे महत्त्वाचे उदाहरण ठरणार आहे. थायलंडच्या जनतेला आता लष्करी हस्तक्षेप नको असून त्यांना आर्थिक सुधारणा आणि अधिक स्वातंत्र्य हवे आहे. सत्तेत कोणीही आले तरी, त्यांना या तरुण आकांक्षी पिढीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. थायलंड आता एका अशा वळणावर उभा आहे जिथे जुन्या परंपरा आणि नवीन आधुनिक लोकशाही यांचा संघर्ष शिगेला पोहोचला आहे. आगामी काही आठवडे थायलंडमध्ये सत्तेची समीकरणे कशी जुळतात, यावर आग्नेय आशियाचे भविष्य अवलंबून असेल.


# राहुल गांधींना गुंडाळण्याचा आटापिटा

सध्या सुरू असलेले संसदीय अधिवेशन फक्त अर्थसंकल्पाच्या आकड्यांवर चर्चा करण्यापुरती मर्यादित नसून विरोधी आणि सत्ताधारी पक्ष यांच्यातील राजकीय आणि वैचारिक युद्धाचे भूमीक्षेत्र ठरले आहे, ज्यात राहुल गांधी केंद्रस्थानी आहेत. राहुल गांधी यांनी या अधिवेशनात सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका केलीच, शिवाय मोठ्या प्रमाणावर नेतृत्वाशी थेट टक्कर घेतली आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही नेतृत्वाविरुद्ध थेट प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यात काही निर्णयांची नैतिकता, देशाच्या हिताची प्राथमिकता आणि सरकारच्या निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता यांबद्दल कठोर टीका केली आहे. त्यांनी जेव्हा एपस्टीन फाईल्स, अमेरिकेतील अदानींविरुद्ध सुरू असलेला खटला, भारत-अमेरिका व्यापार करार आणि ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न एकाच धाग्यात गुंफला, तेव्हा त्यांनी चर्चेचे स्वरूपच बदलून टाकले. साध्या आरोपांपेक्षा त्यांनी संशयाची एक राजकीय रचना उभी केली आहे. अदानींविरुद्धचा खटला हा प्रत्यक्षात मोदींविरुद्धचा खटला आहे, असे म्हणत त्यांनी उद्योग, सत्ता आणि आंतरराष्ट्रीय दबाव यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. भाजपची आर्थिक रचना उद्ध्वस्त होईल, हा त्यांचा दावा सत्तार्धायांच्या आर्थिक पाठबळावर थेट प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. सभागृहातील वातावरण त्याक्षणी तापले, कारण आरोपांची तीव्रता अभूतपूर्व होती. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी तात्काळ हस्तक्षेप करत 'जे बोललात ते सिद्ध करा' असे आव्हान दिले, तेव्हा ते केवळ संसदीय शिस्तीचे पालन नव्हते; तो सत्तार्धायांचा बचावात्मक प्रतिकार होता. राहुल गांधींनी तात्काळ 'मी सर्व पुरावे देईन' असे उत्तर देत आक्रमकतेचा सूर कायम ठेवला. मात्र सभापतींनी 'मी पुरावे मागितले नाहीत, तुम्ही बोलत राहा', असे म्हणत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्याक्षणी सभापतींनी पुरावे का ताब्यात घेतले नाहीत? त्यांना कसली भीती होती? असेही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. राहुल गांधींनी अनिल अंबानींचे नाव घेत एपस्टीन फाईल्सशी त्यांचा संबंध जोडला आणि हरदीप पुरी यांनाही प्रश्नांच्या कक्षेत आणले, तेव्हा त्यांनी सत्तार्धायांना वैयक्तिक पातळीवर अस्वस्थ केले. त्यांनी उपस्थित केलेला 'अनिल अंबानींना तुरुंगात का टाकले नाही?' हा प्रश्न निवडक कारवाईच्या आरोपाकडे निर्देश करणारा होता. सभागृहाबाहेर त्यांनी अमेरिकेच्या न्याय विभागाकडे असलेल्या फाईल्सचा उल्लेख करत हरदीप पुरी आणि अनिल अंबानी यांची नावे घेतली. अदानींना समन्स बजावले गेले असून त्यांनी १८ महिन्यांपासून प्रतिसाद दिलेला नाही, असा आरोप करून त्यांनी भारतीय सत्ताकारणावर परदेशी न्यायप्रक्रियेच्या छायांचा संदर्भ दिला. राहुल गांधींनी भारत-अमेरिका व्यापार कराराला पूर्ण शरणागती असे संबोधत ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला. अमेरिकेला महासत्ता राहण्यासाठी भारतीय डेटा महत्त्वाचा आहे, असा दावा करत त्यांनी डेटा सार्वभौमत्वाचा मुद्दा राष्ट्रीय अस्मितेशी जोडला. अमेरिका कोणाकडून तेल खरेदी करायचे हे ठरवेल का, असा प्रश्न विचारत त्यांनी परराष्ट्र धोरणातील स्वायत्ततेचा मुद्दा अधोरेखित केला. त्यांच्या मते भाजपच्या तिजोरीला वाचवण्यासाठी भारतीयांचे भविष्य पणाला लावले जात आहे. त्यांचे हे विधान सत्तार्धायांच्या नैतिकतेवर थेट हल्ला करणारे आहे. संसद ही केवळ कायदे करण्याची जागा नसून राजकीय नैतिकतेची कसोटी असते. या अधिवेशनात राहुल गांधींनी ती कसोटी अधिक कठीण केली आहे. त्यांच्या वक्तव्यांची सत्यता आणि पुराव्यांची ताकद भविष्यात तपासली जाईल, पण सध्याच्या क्षणी त्यांनी चर्चेचे केंद्र स्वतःकडे खेचले आहे. म्हणूनच सत्ताधारी पक्षाच्या काही नेत्यांमध्ये आता संसदेचे अस्तित्त्व धोक्यात आल्याची भावना झाली आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी पक्षाचे काही खासदार राहुल गांधी यांच्याविरुद्ध विशेषाधिकार हननाचा प्रस्ताव आणण्याची तयारी करत आहेत. सरकारच्या दाव्याप्रमाणे, राहुल गांधी यांनी बजेट चर्चेदरम्यान सदनाला गोंधळात टाकणारे आणि निराधार आरोप करणाऱ्या विधानांचा वापर केला आहे, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज प्रभावित झाले आहे. संसदीय नियमांमधील गंभीर कलमांचा वापर करून, राहुल गांधी यांच्या वक्तव्यातील आरोपांची तपासणी करण्याचा आणि आवश्यक ती कारवाई करण्याचा एक कठोर उपाय म्हणून सरकारकडून पुढे आणण्यात आला आहे. हा प्रस्ताव सामान्य राजकीय वादापेक्षा अधिक संवेदनशील आहे, कारण तो राहुल गांधी यांच्या संसदीय सदस्यत्वाला धोका निर्माण करू शकतो.

# नद्यांचे आरोग्य बिघडलेय!









नद्यांमधील प्रदूषणाबाबत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. यापैकी सर्वाधिक प्रदूषित नद्या म्हणजे ठाणे जिल्ह्यातील काळू आणि मुंबईतील मिठी. भीमा, मुळा, मुळा-मुठा आणि पवना यांचा त्यानंतर क्रमांक लागतो. शहरीकरण आणि औद्योगीकरणासोबत शेतीत होणाऱ्या रसायनांच्या अतिरेकी वापरामुळेही नद्यांचे आरोग्य बिघडले आहे.

महाराष्ट्रात पश्चिम घाटमाथ्यावर तीन नद्यांची खोरी आहेत - कृष्णा, गोदावरी आणि तापी. यापैकी कृष्णा आणि गोदावरी पूर्ववाहिनी आहेत, तर तापी पश्चिमवाहिनी आहे. पश्चिम घाटाच्या पूर्वेला कोकणात पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांचे जाळे आहे. महाराष्ट्रातल्या या सर्वच नद्या आज संकटात आहेत.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एका अहवालानुसार नद्यांमधील प्रदूषणाबाबतीत महाराष्ट्र राज्य भारतात आघाडीवर आहे. यापैकी सर्वाधिक प्रदूषित म्हणजे ठाणे जिल्ह्यातील काळू आणि मुंबईतील मिठी. मिठी ही भारतातील सर्वात प्रदूषित नदी आहे. त्या खालोखाल प्रदूषित नद्या म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील भीमा आणि पुणे जिल्ह्यातील मुळा, मुळा-मुठा आणि पवना. नद्यांमधील प्रदूषणाचा शहरीकरण आणि औद्योगीकरणाशी थेट संबंध आहेच, पण शेतीत होणाऱ्या रसायनांच्या अतिरेकी वापरामुळे ग्रामीण भागातील नद्याही प्रदूषित झालेल्या आहेत. गेल्या काही वर्षांत अतिप्रदूषित नद्यांच्या संख्येत घट झाली, पण सौम्य स्वरूपाचे प्रदूषण असलेल्या प्रवाहांच्या संख्येत वाढही झाली.

मानवी हस्तक्षेपामुळे पाण्यात मिसळलेले जैविक (उदा. प्रक्रिया न करता नदीत सोडलेले मैलापाणी), रासायनिक (उदा. अतिरिक्त खते व तण आणि कीटक नाशके), आणि भौतिक (उदा. धूप होऊन पाण्यात गेलेले मातीचे व रेतीचे कण) पदार्थ अशी प्रदूषणाची ढोबळ व्याख्या करता येईल.

मानवी हस्तक्षेपामुळे पाण्यात अनेक घातक जीवाणूंचे प्रमाण वाढते आहे. प्रतिजैवकांच्या अतिवापरामुळे हे जीवाणू आता महाघातक (सुपरबग) झालेले आहेत. यांच्यामुळे अनेक जीवघेण्या किंवा आरोग्यावर दूरगामी दुष्परिणाम करणाऱ्या रोगांच्या साथी वारंवार येतात. औद्योगिक प्रदूषणही प्रक्रिया न करता जवळच्या ओढ्यात नाहीतर नदीत सोडण्याच्या प्रमाणात वाढ होते आहे. यातून शिसे, पारा, व इतर मानवी आरोग्यासाठी धोकादायक पदार्थ नद्यांच्या पाण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापन योग्य होत नसल्याने हा कचराही नदीपात्रांत येतो. विशेषतः प्लास्टिक प्रदूषण नियंत्रणाच्या बाहेर गेल्यामुळे नद्यांच्या पाण्यात प्लास्टिकचे सूक्ष्म कण मिसळत आहेत. यांचे विघटन होण्यास हजारो वर्षे लागू शकतात, आणि पाणी शुद्धीकरणासाठी केल्या जाणाऱ्या प्रक्रियांना हे दाद देत नाहीत. पिण्याच्या पाण्यावाटे हे सूक्ष्म कण आपल्या सगळ्यांच्या शरीरांमध्ये येऊन बसले आहेत. याचे आरोग्यावर नेमके काय परिणाम होतात, हे आपल्याला अजून पुरते कळलेलेही नाही. जीवनशैलीतील बदलांमुळे आपल्या दैनंदिन जीवनातही घातक रसायनांचा वापर वाढला आहे. ही रसायनेही पाण्याच्या प्रदूषणाला कारणीभूत ठरतात.

प्रदूषण मोजताना मात्र या सर्व घटकांचे मापन होतेच असे नाही. पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण (डिझॉल्व्हड ऑक्सिजन) व पाण्याचे नैसर्गिक रित्या शुद्धीकरण करण्यासाठी आवश्यक ऑक्सिजनची मागणी (बायोकेमिकल व केमिकल ऑक्सिजन डिमांड - बीओडी आणि सीओडी) यांच्या मापनावर सर्वसाधारणतः जास्त भर असतो. त्यामुळे वेगवेगळ्या नद्यांच्या वेगवेगळ्या भागांत प्रत्यक्षात प्रदूषणाची स्थिती काय आहे, व काळाबरोबर कशी बदलत गेली आहे याची पूर्ण माहिती उपलब्ध नाही. तरीही महाराष्ट्रातील नद्यांमधील प्रदूषणाची पातळी भारतात सर्वाधिक दिसते, याचा अर्थ प्रत्यक्षात कितीतरी अधिक गंभीर परिस्थिती आहे. जमिनीवर वाहत्या पाण्यात जसे प्रदूषण होते, तसेच ते भूजलातही होते, पण त्याचे व्यापक मापन व विश्लेषण होतच नाही. म्हणजेच भूजलाच्या प्रदूषणाची व्याप्ती तर अजिबातच कळलेलीही नाही.

शेतीमध्ये वापरलेली अतिरिक्त रसायने नद्या आणि भूजलामध्ये जात आहेत, यावर या रसायनांचा वापरच कमी करणे किंवा टाळणे हाच एकमेव उपाय आहे. शहरी व औद्योगिक सांडपाण्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया करून मगच उरलेले तुलनेने स्वच्छ पाणी नद्यांमध्ये सोडले जायला हवे. विशेषतः उद्योग-व्यवसायांसाठी तर हे कायद्याने बंधनकारकच आहे. पण प्रदूषण मंडळांतील व कारखान्यांमधील अधिकाऱ्यांची भ्रष्ट युती हा यातला सर्वात मोठा अडसर आहे. घरगुती सांडपाण्याचे शुद्धीकरण हा विषय ग्रामीण भागात माहीतच नाही, आणि महाराष्ट्रातील शहरे इतक्या झपाट्याने वाढत आहेत, की कोणत्याही शहरातील सांडपाणी शुद्धीकरणाची क्षमता ३०-४० टक्केच आहे. म्हणजेच गावांमधील सर्व सांडपाणी आणि शहरांमधील एकूण सांडपाण्यापैकी ६०-७० टक्के हे जवळच्या पाण्याच्या प्रवाहात जात आहे. सर्वच ठिकाणी सांडपाणी शुद्धीकरणाची क्षमता झपाट्याने वाढवणे आणि कायद्यांची व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे तातडीने आवश्यक आहे.

यात आणखीही दोन समस्या आहेत. एक म्हणजे महाराष्ट्रातल्या नद्यांवर (विशेषतः कृष्णेच्या खोऱ्यात) भारताच्या इतर कोणत्याही राज्याच्या तुलनेत सर्वाधिक धरणे बांधली गेली आहेत. धरणांमुळे पाण्याचा प्रवाह आटतो, आणि धरणाच्या पुढील नदीपात्र कोरडे पडते. यातच सांडपाणी येत राहते. शुद्ध पाण्याचा प्रवाह थांबतो, आणि नदीपात्रात अशुद्ध पाणी वाहू लागते. दुसरे म्हणजे शहरांमध्ये जी काही थोडीफार सांडपाणी शुद्धीकरणाची यंत्रणा आहे, त्यातून बाहेर पडणारे पाणीही सर्वार्थाने शुद्ध असतेच असे नाही. महापालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभी करताना उपलब्ध जागा आणि निधीनुसार नियोजन करतात. वेगवेगळ्या प्रकारची प्रदूषके बाजूला काढण्यासाठी वेगवेगळ्या प्रक्रियांची, तंत्रज्ञानाची गरज असते, त्या सर्वांची पूर्तता होतेच असे नाही.

गेल्या दशकभरात जागतिक वातावरण बदलामुळे अतिवृष्टी किंवा ढगफुटीसारख्या घटनांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. प्रत्येक महिन्यात पडणाऱ्या पावसाचे प्रमाणही बदलते आहे. यामुळे धरणांचे व्यवस्थापन आव्हानात्मक बनले आहे. साधारण मे महिन्याच्या अखेरीपर्यंत बहुतेक सर्व धरणांमधले वापरण्याजोगे पाणी संपत येते. पाऊस सुरू झाल्यावर प्रत्येक महिन्यात काही टक्के पाणी साठवत पावसाळा संपेपर्यंत धरणे पूर्ण भरतील असे नियोजन करणे अपेक्षित असते. पण यात काही अडसर असतात. उदा. स्थानिक राजकारण्यांना जुलै-ऑगस्टपर्यंतच धरण १०० टक्के भरावे, म्हणजे वर्षभरासाठी पाणी मिळण्याची खात्री जनतेला लगेच देता येईल असे वाटते. गणपती विसर्जनासाठी धरणातून पाणी सोडून नद्या तात्पुरत्या प्रवाही करणे ही एक स्थानिक सांस्कृतिक गरज असते. ही सारी दडपणे आणि पावसाची वाढलेली अनिश्चितता यांमुळे बरेचदा धरणे वेळेआधी भरतात, आणि मग अतिवृष्टी झाल्याने पाणी सोडून द्यावे लागते व पूर येतात. म्हणजेच धरणांनी पूरनियंत्रण होण्याऐवजी पुरांना हातभार लागतो आहे. लोकसंख्यावाढीच्या रेट्यामुळे शेतीपासून घरांपर्यंत अनेक गोष्टी नद्यांच्या पूरक्षेत्रात उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे पूर आला की स्वाभाविकच मोठे नुकसान होते.

याशिवाय स्थानिक परिस्थितीमुळेही काही ठिकाणी आव्हाने निर्माण झाली आहेत. गोदावरी नदीचे खोरे हा तुलनेने कमी पावसाचा भाग आहे. पण बदललेल्या पर्जन्यचक्रामुळे गोदावरीच्या उपनद्यांना आता पूर येतात. इथल्या स्थानिक लोकांमध्ये पुराला तोंड देण्याचे पारंपरिक सामूहिक ज्ञान नसल्याने जास्त नुकसान होते. दुसरीकडे तापी नदीच्या खोऱ्यात गेल्या काही वर्षांत खाणकामांचे प्रमाण वाढल्यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर नद्यांच्या पात्रांत मोठ्या प्रमाणावर वाळू आणि रेती येते आहे. परिणामी नद्यांमधली जैविक परिसंस्था तर कोलमडून पडतेच आहे, पण नद्यांची पात्रे उथळ होत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पुराच्या पाण्याबरोबर शेतांमध्ये रेती येते आहे आणि पावसाळ्यानंतर पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते आहे.

सध्या महाराष्ट्रात नदीकाठ सुधार प्रकल्पांचेही पेव फुटले आहे. या प्रकल्पांमुळे नद्या वाहत्या आणि स्वच्छ होतील, पूर नियंत्रण होईल असे दावे केले जात आहेत. पण नदीचे पात्र सरळ व अरुंद करून किनाऱ्यांवर भिंती बांधणे, सुशोभीकरणाच्या नावाने नदीकाठांवरच्या वनराईचा नायनाट करून सिमेंटच्या पायऱ्या, कठडे, इ. उभे करणे, यातून पुरांचा धोका वाढतो आहे. या प्रकल्पांमध्ये पाणी शुद्धीकरणाचे काहीही नियोजन नाही.

इंडियन एन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) येथील वैज्ञानिकांनी केलेल्या अभ्यासानुसार मुळा, मुठा व मुळा-मुठा नद्यांच्या परिसरातील नैसर्गिक संपदेतून दरवर्षी साधारण पाच हजार कोटी रुपये किंमतीच्या विविध पर्यावरणीय सेवा या परिसरातील नागरिकांना फुकट मिळत आहेत. या नद्यांच्या ४४ किमी लांबीच्या दोन्ही किनाऱ्यांवर होत असलेल्या नदीकाठ सुधार प्रकल्पामुळे त्यांवर गदा येणार आहे. महाराष्ट्रात इतरत्रही असे प्रकल्प होत आहेत, त्यामुळे संपूर्ण राज्यात होणाऱ्या वार्षिक नुकसानीचा आकडा प्रचंड मोठा असणार आहे.

दुर्दैवाने प्रत्यक्ष समस्यांच्या मुळाशी जाऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून दीर्घकालीन व मूलभूत उपाययोजना करण्याऐवजी जनतेची दिशाभूल करून भ्रष्टाचाराच्या संधी शोधणे हे आजच्या निर्णयकर्त्यांनी जास्त महत्त्वाचे मानले आहे. महाराष्ट्रातील राजकारणी, सनदी अधिकारी व उद्योजकांच्या 'सहकारातून समृद्धी'ची किंमत आपल्या नद्या चुकवत आहेत. यातून पाणीटंचाई, आरोग्यावर संकटे, पुराचा धोका, इ. आघातांना सामान्य जनतेलाच तोंड द्यावे लागणार आहे.

# महाशिवरात्रीचे व्रत का करावे?

माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथी महाशिवरात्र म्हणून पाळली जाते. या दिवशी उपवासाचे व्रत करतात. भगवान शिवाची आराधना आणि प्रार्थना करून दुर्सया दिवशी व्रताची सांगता केली जाते. महाशिवरात्री माघ वद्य त्रयोदशीला महाशिवरात्री म्हणतात. महाशिवरात्रीचे व्रत हे काम्य व नैमित्तिक कात आहे.

**महाशिवरात्रीचे व्रत का करावे :** शिवाच्या विश्रांतीच्या काळात शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या काळात शिव ध्यानावस्थेतून समाधी-अवस्थेत जातो. शिवाची समाधी-अवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ. त्या काळात विश्वातील तमोगुण शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे विश्वामध्ये तमोगुणाचे प्रमाण किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून शिवतत्त्व आकृष्ट करून घेण्यासाठी महाशिवरात्रीचे कात करावे.

**व्रत आचरण्याची पद्धत व विधी :** उपवास, पूजा व जागरण ही या काताची तीन अंगे आहेत. शिवरात्रीच्या दिवशी एकभुक्त राहावे. शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना ''यामपूजा'' असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालून अनुलेपन करावे. शिवतत्त्व आकृष्ट करणारा बेल, पांढरी फुले व रुद्राक्षांच्या माळा शाळुंका व शिवपिंडीवर वाहाव्यात. धोत्रा व आंबा यांची पत्रीही या पूजेत वाहतात. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून त्यांनी शिवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेचे मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. शिवस्मरणात जागरण करावे. पहाटे स्नान करून पुन्हा पूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. ब्राह्मणांचा आशीर्वाद घेऊन कातसमाप्ती करावी.

**महाशिवरात्रीला शिवाचा नामजप करण्याचे महत्त्व :** महाशिवरात्रीला विश्वात वाढणाऱ्या तमोगुणापासून रक्षण होण्याकरता शिवतत्त्व आकृष्ट करण्यासाठी शिवाचा ''ॐ नमः शिवाय'' हा नामजप जास्तीतजास्त करावा.

**शिवपूजेची वैशिष्ट्ये :**

- शिवपिंडीला थंड पाणी, दूध किंवा पंचामृत यांनी स्नान घालतात.
- शिवाच्या पूजेत हळद-कुंकू वापरत नाहीत; मात्र भस्म वापरतात.
- शिवपूजेत पांढऱ्या अक्षता वापरतात.
- शिवाक्षाला तांदूळ, क्वचित गहू व पांढरी फुले वाहतात.
- शिवपिंडीला पूर्ण प्रदक्षिणा न घालता अर्धचंद्राकृती प्रदक्षिणा घालतात.

महाशिवरात्री कधी व का साजरी केली जाते? महाशिवरात्रीचे महत्व काय आहे? महाशिवरात्रीचे व्रत व उपासना कशी केली जाते? महाशिवरात्रीची कथा काय आहे? हि सर्व माहिती आज आपण या लेखातून जाणून घेणार आहोत. चला तर मग सुरुवात करूया. भारत देश हा संस्कृती प्रधान देश आहे. आपल्या देशात सांस्कृतिक व धार्मिक सण ठिकठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. भारतात देवदेवतांबद्दल निरतिशय प्रेम दिसण्यात येते. शिव ही वैदिक कालीन देवता आहे. वैदिक वाङ्मयात शिवाचे वर्णन आहे. दक्षिण भारतात तिसऱ्या शतकात शंगम वाङ्मयाला फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. या वाङ्मयात शंकराचे वर्णन कर्पूरगौर, सर्वश्रेष्ठ देव, कैलास पर्वतावर राहणारे, व्याघ्राजीन पांघरणारे, परशू धारण करणारे असे आहे. देवांचे ही देव, सर्वात श्रेष्ठ देव म्हणूनच की काय त्यांना महादेव असे म्हटले जाते असे वाटते.

## महाशिवरात्र कधी साजरी केली जाते?

संस्कृत पुराण साहित्यामध्ये अग्नीपुराण, शिवपुराण, पद्मपुराण या ग्रंथांमध्ये महाशिवरात्री या व्रताचे महत्त्व सांगितले आहे. माघ महिन्यातील वद्य चतुर्दशीला महाशिवरात्र असे म्हणतात. प्रत्येक महिन्यातील वद्य चतुर्दशीला शिवरात्र असते. परंतु माघ कृष्ण पक्षातील शिवरात्रीचा महिमा फार मोठा आहे.या दिवशी भगवान शंकराची उपासना केली जाते. तसेच या दिवशी सर्व हिंदू बांधव उपवास करतात.

## महाशिवरात्री का साजरी केली जाते?

काही दंतकथेनुसार समुद्रमंथनातून निघालेली रत्ने सर्वांनी घेतली. परंतु त्यातून निघालेले हलाहल भगवान शंकरांनी आपल्या कंठात साठवून ठेवले होते त्यामुळे त्यांचा कंठ निळा पडला होता. त्यामुळे त्यांना नीलकंठ असे म्हटले जाते. भगवान शंकरानी सृष्टीच्या कल्याणा साठी ते प्राशन केले आणि जगाला विनाशापासून वाचवले. अमृत पितो तो 'देव' विष पितो तो 'महादेव' असे म्हणतात. म्हणून भगवान शंकरांचे हे ऋण फेडण्याचा दिवस म्हणजेच महाशिवरात्री होय. शिवपुराणाच्या कथेनुसार महिन्याच्या कृष्णा पक्षातील चतुर्दशीला भगवान शिवलिंगाच्या रूरूपात प्रकट झाले. तेव्हा भगवान विष्णू व ब्रह्मा यांनी प्रथम शिवलिंगाची पूजा केली. तर दुसरीकडे असे म्हटले जाते की, महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शंकर व देवी पार्वती यांचा विवाह पार पडला होता. यामुळे महाशिवरात्री साजरी केली जाते.

## महाशिवरात्रीचे व्रत व उपासना :

- शंकरप्रभूची पूजा महाशिवरात्रीच्या मध्यरात्री असणाऱ्या निशिथकालात प्रदोषात सर्वात प्रभावी मानली जाते.
- शिवरात्रीच्या दिवशी रुद्राभिषेकाला फार महत्त्व आहे.
- या दिवशी उपवास करतात. हे व्रत पूर्ण एक दिवस असून दुसऱ्या दिवशी व्रताची समाप्ती होते.
- शिवपुराण, शिवस्तुती, शिवअष्टक, शिवचालीसा, शिव रुद्राष्टक, शिवाचेश्लोक, शिवपंचाक्षर आणि शास्त्र नामांमध्ये शिवाचा पाठ केला जातो.
- शिवकृपा प्राप्त होण्यासाठी 'ओम' किंवा 'ओम नमः शिवाय या मंत्रोच्चाराचे चिंतन महत्त्वपूर्ण मानले जाते.
- महाशिवरात्रीला जागरणाचे खूप महत्त्व आहे. हे व्रत इच्छा पूर्ण करणारे आहे असे मानले जाते.

## महाशिवरात्रीचे महत्त्व

सृष्टी निर्माण करणारे श्री ब्रम्हदेव, पालन करणारे श्रीविष्णु देव आणि संहार करणारे श्री महादेव हे आहेत. म्हणूनच प्रत्येकाचा शेवट किंवा मोक्ष यावर महादेवांचा अंकुश आहे असे म्हटले जाते. गेल्या जन्माचे भोग आपल्याला या जन्मात दुःख, हालअपेष्टा, संकटे, दारिद्य, शारीरिक, मानसिक त्रास या स्वरूपात भोगावे लागते. या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य महादेव करतात. भगवान शंकर म्हणजेच खरे निर्गुण, निराकार, परब्रम्ह आहेत अशा या मोक्ष कार्य महादेवाला प्रसन्न करण्याचा दिवस म्हणजे महाशिवरात्री. या दिवशी मनोभावे महादेवाची उपासना केल्यास मोक्ष प्राप्ती होते. या दिवशी केलेली उपासना ही मानवी जीवनाला सुख देते.

## १२ ज्योतिर्लिंग

भारतात शंकर प्रभुची प्रसिद्ध अशी बारा ज्योतिर्लिंग आहेत. असे म्हणतात की, जो रोज प्रभातकाळी या बारा ज्योतिर्लिंगांची नावे घेईल, त्याची सर्व पापे नष्ट होऊन त्याला सर्व सिद्धी प्राप्त होते.

- सोरटी सोमनाथ - सोरटी म्हणजे सौराष्ट्र. सौराष्ट्रातील प्रभासक्षेत्रात सोमनाथ या नावाने प्रसिद्ध आहे. याचे उपलिंगाचे नाव अनंतकेश्वर आहे. हे महीनदी जेथे सिंधू सागराला मिळते, त्या संगमावर आहे.
- श्री शैलपर्वतावर मल्लिकार्जुन नावाचे ज्योतिर्लिंग आहे. हे कृष्णा नदीच्या काठावर आहे. याचे उपलिंगाचे नाव रुद्रेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.
- ओंकारेश्वर खांडवा-इंदोर अग्निरथाच्या मार्गावर बारा किलोमीटर अंतरावर ओंकारेश्वर हे ज्योतिर्लिंग नर्मदेच्या काठावर आहे. याच्या उपलिंगाचे नाव कर्दमेश्वर आहे.
- हिमालयात केदारेश्वर हे यमुनेच्या काठी आहे. याचे उपलिंग भूतेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.
- सिंह पर्वतावर भीमा नदीच्या काठावर, महाराष्ट्रात नाशिक हून १८० किलोमीटरवर भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग आहे. याच्या उपलिंगाला भिमेश्वर असे म्हणतात.
- काशी वाराणसी येथे गंगेच्या काठावर काशी विश्वनाथ हे महाप्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे.
- महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात गोदावरीच्या उगमा जवळ त्रंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे.
- परळी वैजनाथ नावाचे ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात मराठवाडा परळीला आहे.
- औंढा नागनाथ हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्र, मराठवाडा हिंगोलीहून २७ किलोमीटरवर आहे.
- सेतुबंध रामेश्वर हे ज्योतिर्लिंग भारताच्या दक्षिण टोकाला हिंद महासागराच्या तटावर आहे.
- घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्र, औरंगाबाद वेरूळ येथे आहे.

## महाशिवरात्रीच्या काही कथा

महाशिवरात्रीला मोठा इतिहास आहे आणि ती पाचव्या शतकापर्यंत साजरी केली जात असल्याचा पुरावा आहे. स्कंद पुराण, लिंग पुराण आणि पद्म पुराणांसह अनेक मध्ययुगीन पुराणांचा असा दावा आहे की महाशिवरात्री ही अशीच एक घटना आहे, विशेषतः भगवान शिवाचा सन्मान करते. शैव उपासक या सुट्टीला इतके उच्च मूल्य का देतात हे यावरून स्पष्ट होते.

**१. भगवान शिवाच्या दंतकथेचा अग्निस्तंभ :** महाशिवरात्रीच्या दिवसापासून अनेक पौराणिक कथा प्रचलित आहेत. असे म्हणतात की ब्रह्मा आणि विष्णू या दोन देवांमध्ये श्रेष्ठ कोण यावर एकदा भांडण झाले. ज्यामध्ये भगवान विष्णूंनी स्वतःला संपूर्ण सृष्टीचा रक्षक म्हणून श्रेष्ठ म्हणून वर्णन केले आहे, तर ब्रह्माजींनी विश्वाचा निमार्ता म्हणून स्वतःला श्रेष्ठ असल्याचा दावा केला आहे. त्यानंतर तेथे विराट लिंग साकारले. दोन्ही देवतांनी मान्य केले की जो व्यक्ती लिंगाचा शेवट प्रथम शोधेल तो सर्वोत्तम मानला जाईल. शिवलिंगाची टोके शोधण्यासाठी ते दोघे दुसरीकडे वळले. कोणतेही प्रयोजन नसल्यामुळे विष्णू परत गेला. जरी ब्रह्माजी शिवलिंगाचा उगम झाला ते ठिकाण शोधण्यात अयशस्वी झाले, तरीही ते तेथे आले आणि त्यांनी विष्णूला सांगितले की ते निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत. ज्यात त्यांनी याचा पुरावा म्हणून केतकीच्या फुलाचाही उल्लेख केला होता. जेव्हा ब्रह्माजींनी सत्य प्रकट केले तेव्हा शिव स्वतः प्रकट झाले आणि रागाच्या भरात त्यांनी ब्रह्माजींचे एक मस्तक तोडले, केतकीच्या फुलाचा उपयोग त्यांच्या पूजेत होऊ नये म्हणून शाप दिला आणि त्यांनी असेही सांगितले की ही घटना घडेल. नेहमी फाल्गुन महिन्यात होतो. चौदाव्या दिवशी भगवान शिवाने शिवलिंगाचे रूप धारण केले. त्यामुळे आजचा दिवस महाशिवरात्री मानला जातो.

**२. हलहल विष कथा :** या प्रमाणेच भगवान शिवाने विष प्राशन केल्याची आणखी एक कथा आहे. देव आणि दानव अमृताचा शोध घेत असताना समुद्र खवळला होता. मग महासागरातून अनेक गोष्टी बाहेर आल्या. त्यापैकी एक हलाहल विष होते, जे इतके शक्तिशाली आणि प्राणघातक होते की सर्व देवता आणि असुरांनी त्यांना त्या भांड्याजवळ जाण्यास मनाई केली होती. सर्व देवतांनी भगवान शिवाच्या गर्भगृहात प्रवास केला आणि संपूर्ण ग्रहाच्या संरक्षणासाठी प्रार्थना केली. विषारी विषापासून जेव्हा या समस्येने संपूर्ण जगात दहशत निर्माण केली आणि सर्व सजीवांना धोका होता. हे भयंकर विष नंतर भगवान शंकरांनी ग्रासले होते, त्यांनी ते गिळले. त्यामुळे त्याचा कंठ निळा झाला आणि त्याला नीलकंठ हे नाव पडले. तेव्हापासून महाशिवरात्री एकाच दिवशी साजरी केली जाते.

**३. शिव-पार्वती जयंतीशी संबंधित कथा :** महाशिवरात्रीच्या सभोवतालची तिसरी सर्वात प्रसिद्ध आख्यायिका दावा करते की भगवान शिव देखील त्यांच्या पहिल्या वधू सतीच्या निधनानंतर अत्यंत दुःखाचा अनुभव घेतात. त्यानंतर सतीला माता पार्वती म्हणून नवीन जन्म मिळेल. परिणामी भगवान शिव त्याच्याकडे थोडे लक्ष देतात. त्यानंतर, ती भगवान शिवची तपश्चर्या संपवण्यासाठी कामदेवाची मदत घेते, परंतु कामदेवाचाही या प्रक्रियेत नाश होतो. जसजसा वेळ जातो तसतसे भगवान शिव माता पार्वतीची पूजा करण्यासाठी वाढतात आणि तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतात. या विवाहासाठी फाल्गुन महिन्यातील अमावास्येचा दिवस निश्चित करण्यात आला आहे. म्हणूनच हा दिवस महाशिवरात्री उत्सवाला समर्पित आहे.

## महाशिवरात्री – जागरणाची रात्र

महाशिवरात्री ही प्रत्येक व्यक्तीच्या आत असलेल्या आणि सर्व सृष्टीची उत्पत्ती असलेल्या अमर्याद शून्यतेच्या जाणीवेशी जोडण्याची संधी आहे. शिवाला कधीकधी संहारक म्हणून संबोधले जाते, परंतु ते सर्वात काळजी घेणारे देखील आहे. अपार करुणेच्या वेषात ते योगसागांमध्ये असंख्य रूपे दाखवतात. त्यांच्या दयाळूपणाने आश्चर्यकारक आणि असामान्य रूप धारण केले आहे. परिणामी, महाशिवरात्री २०२५ रोजी अनेक ग्रहणांची एक अनोखी रात्र असेल. आम्ही आशा करतो आणि प्रार्थना करतो की आज संध्याकाळी आम्ही ज्या अमर्याद विस्ताराचा उल्लेख करतो ते तुम्हाला कमीत कमी थोडक्यात जाणवेल. ही तुमच्यासाठी जागरणाची रात्र असावी, चैतन्य आणि जागरुकतेने भरलेली, केवळ जागरणाची थकलेली रात्र नसावी.

**शिव रुद्राभिषेक :** संपूर्ण श्रावण महिना शिव रुद्राभिषेकासाठी विशेष महत्त्वाचा आहे. शिवाला विविध द्रव्यांनी स्नान घालण्याची प्रथा शिव रुद्राभिषेक म्हणून ओळखली जाते. शिवाच्या उच्चाराच्या व्यतिरिक्त अभिषेक पद्धतीचे आयोजन करण्याची शिफारस केली जाते कारण यजुर्वेदातील शिव रुद्राभिषेकाचे वर्णन संपूर्णपणे अनुसरण करणे कठीण आहे.

## या महाशिवरात्रीला काय करू नये

- महा शिवरात्री म्हणजे आनंदाचा, उत्सवाचा दिवस. महाशिवरात्रीच्या वेळी फक्त ध्यान करा, भगवान शिवाची पूजा करा आणि इतर आध्यात्मिक साधना करा.
- जर तुम्ही कठोर व्रत पाळत असाल तर शिवरात्रीला झोपू नका.
- भगवान शिवाच्या पवित्र महिमाचे चिंतन करताना रात्रभर मंत्र गाणे आणि जपत राहा.
- मनोरंजक क्रियाकलापांपासून दूर राहा, निरर्थक वाद आणि खोटे बोलणे टाळा आणि या कालावधीत केवळ देवाचे ध्यान करण्यासाठी आणि त्याची उपासना करण्यासाठी वेळ बाजूला ठेवा.
- फक्त शाकाहारी जेवण खा. कोणत्याही परिस्थितीत दारू आणि इतर मादक पदार्थ टाळा.

## महा शिवरात्रीच्या १० ओळी

- भगवान शिवाच्या प्रमुख सणाला महाशिवरात्री म्हणतात.
- ही हिंदूंची प्राथमिक सुट्टी आहे.
- दरवर्षी फाल्गुन कृष्ण चतुर्दशीला महाशिवरात्री साजरी केली जाते.
- महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिव आणि माता पार्वतीचा विवाह झाला.
- या दिवशी सृष्टीची सुरुवात झाली असे पुराण सांगतात.
- या दिवशी बहुसंख्य लोक पूर्ण दिवस उपवास करतात.
- या दिवशी प्रत्येक मंदिरात शिवाला अभिषेक केला जातो.
- भगवान शिवाला पंचामृत, बेलपत्र, भांग, धतुरा आणि बेर ही फळे दिली जातात.
- या दिवशी मंदिरात भजन कीर्तन केले जाते.
- या दिवशी, जो कोणी उपवास करतो त्याच्या सर्व मागण्या मान्य केल्या जातात.




# महाशिवरात्री कधी आहे?

## जाणून घ्या तारीख, पूजा, विधी अन् शुभ मुहूर्त

महाशिवरात्री हा महादेवाच्या भक्तांसाठी अत्यंत खास दिवस असतो. हिंदू ग्रंथ, पुराणांमध्ये या दिवसाचे विशेष महत्व सांगितले आहे. पवित्र दिवसांपैकी एक असा हा दिवस शिव- शक्ती मिलनाचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे महाशिवरात्रीनिमित्त विविध भागात खास पूजा तसेच होम- हवन केले जातात. आत्मशुद्धी, मोक्ष आणि महादेवाचा आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी महाशिवरात्रीचा मुहूर्त सर्वोत्तम असल्याचे सांगितले जाते. यंदा महाशिवरात्री कधी आहे? आणि या दिवशी पूजा करण्याची पद्धत जाणून घेऊया..

**महाशिवरात्रीची तिथी आणि शुभ मुहूर्त :** यंदा महाशिवरात्रीची तिथी १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ०५ वाजून ०४ मिनिटांनी सुरू होणार आहे. तर १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ०५ वाजून ३४ मिनिटांनी ही तिथी समाप्त होणार आहे. त्यामुळे यंदा महाशिवरात्री १५ फेब्रुवारी २०२६ रोजी साजरी केली जाईल. १५ फेब्रुवारीच्या रात्री १२ वाजून ०९ मिनिटांपासून ते ०१ वाजून ०१ मिनिटांपर्यंतचा कालावधी पूजेसाठी शुभ मानला जातो. या वेळी शिवलिंगावर अभिषेक आणि मंत्रांचा जप करणे अत्यंत फलदायी मानले जाते. मध्यरात्रीची वेळ शिव ध्यानासाठी सर्वात पवित्र असल्याची मान्यता आहे. मार्कंडेय पुराणातील श्री दुर्गा सप्तशतीमध्ये तीन प्रकारच्या दारुण रात्रींचा उल्लेख आहे. या तीन रात्रींना कालरात्री, महारात्री आणि मोहरात्री असे म्हटले आहे. होळीचा सण कालरात्रीच्या रूपात साजरा केला जातो. तर दिवाळी आणि शरद पौर्णिमेला मोहरात्रीचा सण मानले आहे. तथापि, काही विद्वान दिवाळीला कालरात्रीचा सण देखील मानतात. शिवरात्रीला विशेषतः महारात्री म्हटले आहे, कारण ही रात्र साधना आणि भक्तीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. हिंदू धर्मात बहुतेक सण सूर्योदयानंतर साजरे करण्याची परंपरा आहे, परंतु काही सण असे आहेत जे रात्री साजरे केले पाहिजेत. यामध्ये होळी, दिवाळी, शरद पौर्णिमा, जन्माष्टमी, शिवरात्री आणि नवरात्री प्रमुख आहेत. या सणांमध्ये रात्रीचे महत्त्व आहे, कारण हा काळ साधना, ध्यान आणि ईश्वराशी जोडले जाण्यासाठी सर्वोत्तम मानला जातो.

**पूजा विधी आणि साहित्य :** महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे. स्वच्छ पांढरे कपडे परिधान करावे. त्यानंतर घरातील देवाची पूजा करावी. दिवसभर उपवास करून फलाहार घ्यावा. मग रात्री महादेवाच्या शिवलिंगावर जलाभिषेक करून भस्म, चंदन लावावे. बेलपत्र, पांढरी फुले अर्पण करावे. त्यानंतर ओम नमः शिवाय या मंत्राचा किमान १ ते ११ माळा जप करावा. शिवस्तुतीचे पठण करावे, महाशिवरात्रीची कथा वाचावी. शेवटी धूप, कापूर आणि गाईच्या तुपाचा दिवा लावून महादेवाची आरती करावी. महादेवाला प्रसादात ठंडाई, लस्सी, मिठाई, फळे आणि हलवा दाखवण्याची फार जुनी परंपरा आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी व्रत सोडावे.

**कोणत्या मंत्राचा जप करावा?**

- कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम्। सदा बसन्तं हृदयारबिन्दे भवं भवानीसहितं नमामि।।
- ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्। उवार्रुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्।।
- ॐ महादेवाय विद्महे रुद्रमूर्तये धीमहि तन्नः शिवः प्रचोदयात्।।
- ॐ पार्वतीपतये नमः
- ॐ नमः शिवाय

# महाशिवरात्री उपवास! विक्रती फराळ आणि धोका, अशी घ्या काळजी...

हिंदू पंचांगानुसार यंदा महाशिवरात्री १५ फेब्रुवारीला साजरी केल्या जाणार आहे. फाल्गुन महिन्याच्या कृष्णपक्षातील चतुर्दशीस महाशिवरात्री साजरी केली जाते. या दिवशी शिव व पार्वती यांचा विवाह पार पडला, अशी पौराणिक मान्यता आहे. कडकडीत उपवास पण फराळ दिमतीस असतोच. काही केवळ दुधावर तर बरेच विविध फराळी खाद्यवार दिवस काढतात. आता तर बाजारात या दिवशी विविध फराळी खाद्यची रेलचेल दिसून येते. म्हणून अन्न व औषधी प्रशासनाने खबरदारी घेण्याचा इशारा दिला आहे.

उपवास करणारे मोठ्या भगर, साबुदाणा, शिंगाडा व राजगिरा पीठ तसेच अन्य पदार्थांचा वापर करतात. मात्र या पदार्थांचे सेवन केल्याने विषबाधा झाल्याच्या घटना उजेडात आल्या आहेत, असे अन्न व औषधी विभागाचे सहाय्यक आयुक्त प्र. भा. टोपले यांनी निदर्शनास आणले आहे. म्हणून खबरदारी घेणे आवश्यक आहे. बाजारातून पदार्थ आणल्यावर ते स्वच्छ करावे. शक्यतो पाकीटबंद पदार्थ घ्यावे. पॅकिंग व अंतिम वापर दिनांक तपासावा. हे अन्नपदार्थ झाकणबंद डब्यात व कोरड्या ठिकाणी ठेवावे. ओलावा असल्यास बुरशी लागणार. ज्यास्त दिवस साठवू नये.फराळासाठी उघड्यावरचे पदार्थ विकत घेणे टाळावे. भगरीची भाकर करण्याऐवजी खिचडी खावी. भगर व शेंगदाणे यात अधिक प्रथीने असतात. सलग उपवास असतांना या पदार्थांचे सेवन ॲसिडिटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे विकार होवू शकतात. म्हणून पचन क्षमतेनुसार भगर व शेंगदाणे खावेत. शिळ्या अन्न पदार्थांचे सेवन करू नये.

या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थ विकणाऱ्यांना पण सूचना करण्यात आल्या आहेत. विक्रेत्यांनी पॅकबंद पदार्थांचीच विक्री करावी. पदार्थ विकत घेतांना उत्पादक किंवा विक्रेत्याकडून बिले घ्यावीत. पदाथार्चे पॅकेट तसेच पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना, पॅकिंग व अंतिम वापर दिनांक याची खात्री करावी. विक्रेत्यांनी मुदतबाह्य पदार्थांची विक्री करू नये. तयार अन्न पदार्थ उघड्यावर ठेवू नये व ते तयार करतांना आरोग्य तसेच स्वच्छतेचे निकष पाळावे, अशी सूचना हॉटेल मालकांना करण्यात आली असल्याचे आयुक्त टोपले यांनी नमूद केले.

अध्यात्म व व्रतवैकल्याचे जाणकार पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री हे म्हणतात की फराळबाबतीत खबरदारी आवश्यक आहे. या दिवशी अनेक ठिकाणी फराळ वाटप केल्या जाते. सार्वजनिक ठिकाणी होणारे असे वितरण दक्षता घेऊन झाले पाहिजे. अधिकाऱ्यांनी तपासणी करावी. खरं तर हा फराळ नव्हे तर शिवजीला अर्पण केल्या जाणारा प्रसाद असतो. घरच्या गृहिणीने पवित्र मनाने व स्वच्छतेची काळजी घेऊन तयार केलेला प्रसाद पावतो. प्रसाद फराळ ही आराधना समजावी. मिताहार करावा.

# मुंबईतील रस्ते कामांची पालिका आयुक्तांकडून झाडाझडती

## रस्त्यांची ६३ टक्के कामे पूर्ण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

खड्डेमुक्त मुंबईसाठी मुंबईतील रस्ते सिमेंट काँक्रीट करण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे. सिमेंट काँक्रीटीकरण टप्पा १ अंतर्गत निर्धारित उद्दिष्टांपैकी ७७ टक्के कामे पूर्ण झाली आहेत, तर टप्पा २ अंतर्गत ५२ टक्के कामे पूर्णत्वास गेली असून एकूण मिळून ६३ टक्के कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहेत. पुढील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण कामे करताना रस्तेनिहाय सूक्ष्म नियोजन करावे. हाती घेतलेला रस्ता, खोदण्यात आलेला रस्ता निश्चित केलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावा, असे स्पष्ट निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. काँक्रीटीकरण कामे करताना लोकप्रतिनिधींसमवेत संवाद साधावा, त्यांना इत्यंभूत माहिती द्यावी, त्यांचा प्रतिसाद मिळवावा, असे निर्देश गगराणी यांनी दिले आहेत.

मुंबईच्या पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वाकांक्षी सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. टप्पा १ आणि टप्पा २ अंतर्गत शहर आणि उपनगर भागात काँक्रीटीकरण कामे सुरू आहेत. या कामांचा महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर, उप आयुक्त गिरीश निकम, प्रमुख अभियंता मंतय्या स्वामी यांच्यासह संबंधित अभियंते उपस्थित होते.






रस्ते काँक्रीटीकरण प्रकल्पामुळे रस्ते प्रवास अधिक सुरक्षित, सुकर आणि जलद होणार आहे. काँक्रीट रस्त्यावर पावसामुळे खड्डे होण्याचे प्रमाण अत्यल्प राहते, परिणामी देखभाल आणि परिरक्षणाचा खर्चही मोठ्या प्रमाणावर वाचतो. मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला आधुनिक, सुरक्षित आणि सुयोग्य स्वरूप देण्याच्या दृष्टीने रस्ते काँक्रीटीकरण प्रकल्पाची अंमलबजावणी हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे. महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्पाच्या टप्पा १ आणि टप्पा २ अंतर्गत १० फेब्रुवारी अखेर एकूण १५९४ रस्त्यांचे मिळून ४३०.६९ किलोमीटर लांबीचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यात आले आहे. टप्पा १ अंतर्गत निश्चित केलेल्या उद्दिष्टापैकी ७७ टक्के तर, टप्पा २ अंतर्गत निश्चित केलेल्या उद्दिष्टापैकी ५२ टक्के लक्ष्यपूर्ती करण्यात आली आहे. म्हणजेच टप्पा १ आणि टप्पा २ असे एकत्रित मिळून पूर्ण झालेल्या कामांची टक्केवारी ६३ इतकी आहे, असे गगराणी यांनी सांगितले.

### रस्ते कामात अभियंत्यांची प्रत्यक्ष हजेरी अनिवार्य

काँक्रीटी रस्त्यांची अंमलबजावणी सुरू असताना अभियंत्यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कामे सुरू करताना कामाच्या गुणवत्तेत विशेष लक्ष द्यावे, गुणवत्तापूर्ण काम करणे म्हणजे केवळ रस्त्याचा पृष्ठभाग चांगला असणे नव्हे तर, त्याच्या बेस लेवलपासून प्रत्येक स्तरावर मानकाप्रमाणे सर्व घटकस्तर व त्याच्याशी संबंधित आर्द्रता, तापमान इत्यादीसह तांत्रिक निकष तंतोतंत पाळले जाणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अभिजित बांगर यांनी सांगितले.

### पावसाळ्यापूर्वी महत्त्वाचा टप्प्पा गाठा

भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे काँक्रीटीकरण कामे अधिक गुणवत्तापूर्ण होत आहेत, असा प्रतिसाद सहायक अभियंत्यांनी दिला आहे. विद्यमान सत्र संपण्यापूर्वी ९० दिवसांचा कालावधी हातामध्ये आहे. या ९० दिवसांचे सूक्ष्म नियोजन केले तर पावसाळ्यापूर्वी काँक्रीटीकरण प्रकल्पाचा महत्त्वाचा टप्प्पा गाठता येऊ शकतो, असे बांगर यांनी नमूद केले.

# मुंबईतील फेरीवाल्यांची खैर नाही

## महापालिकेचा आतापर्यंतचा सर्वात कडक निर्णय, महापौरांचा थेट इशारा

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेतून वितरित करण्यात आलेल्या २३७ बोगस जन्मप्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. मुंबई महापालिकेने ही प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. पण तरीही अजूनही ती प्रमाणपत्रे अनधिकृत बांगलादेशी घुसखोरांच्या ताब्यात कशी? असा संतप्त सवाल रितू तावडे यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई न झाल्यास थेट सभागृहात प्रस्ताव आणण्याचा इशारा महापौरांनी दिला आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई केली जाणार आहे अशा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. मुंबईतील फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याची आता कठोरपणे तपासणी केली जाणार आहे, असे रितू तावडे यांनी म्हटले.

आतापर्यंत २३७ बोगस जन्मप्रमाणपत्र मुंबई महापालिकेने दिले आहे. हे जन्मप्रमाणपत्र त्यांनी रद्द केले आहेत. पण जे ओरिजनल जन्मप्रमाणपत्र अनधिकृत बांग्लादेशींकडे आहेत, ते अजून त्यांच्याकडून घेण्यात आलेले नाही. जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, तर त्यांच्याविरुद्ध सभागृहात प्रस्ताव आणावा लागेल. बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम जर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून होत असेल, तर आम्हाला कडक कारवाई करावी लागेल, असा कडक इशारा रितू तावडे यांनी दिला.

**मुंबईतील फेरीवाल्यांवर कशाप्रकारे कारवाई होणार?**

तसेच मुंबईत जे कोणी फेरीवाले, फुटपाथवर बसतात, त्या सर्वांचे जन्मप्रमाणपत्र आम्ही चेक करणार आहोत. ती मोहीम आम्ही जोरदार हातात घेणार आहोत. त्यामुळे जे कोणी फेरीवाले आहेत त्यांचे जन्मप्रमाणपत्र कठोर पद्धतीने चेक केले जाणार आहेत. यावर कोणतीही माफी केली जाणार नाही, असे रितू तावडे यांनी सांगितले.कारण हा देशद्रोहाचा प्रकार आहे. तसेच ज्या कोणत्या बांग्लादेशींना सांभाळण्याचे काम अधिकारी करत असतील त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. हे करत असताना आम्ही प्रत्येक फेरीवाल्याचे जन्मप्रमाणपत्र, आधार कार्ड हे चेक केले जाईल, असेही रितू तावडे म्हणाल्या.

# इयत्ता १ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर... राज्य सरकारकडून १६५ कोटींची तरतूद

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यातील सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येणार आहे. मोफत दप्तर देण्यास राज्य सरकारची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यासाठी १६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत ही दप्तरं पुरवण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे.



१३ फेब्रुवारी रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायदा २००९ तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक उपक्रमातंर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेतंर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये दप्तर पुरवण्यात येईल. इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वषार्पासून मोफत दप्तर देण्यात येईल. राज्यातील ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. शिक्षण संचलकांनी हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे. या प्रस्तावानुसार, १६५ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे.

# बंदी असूनही रेस्टॉरंट्सकडून सर्व्हिस चार्ज आकारणी सुरूच

## मुंबई ग्राहक पंचायतीची रेस्टॉरंट्सवर कडक कारवाईची मागणी




■मुंबई। प्रतिनिधी,

कायदेशीर बंदी असूनही मुंबईतील अनेक रेस्टॉरंट्समध्ये ५ ते १० टक्के सर्व्हिस चार्ज बिलामध्ये आकारला जात असल्याचे आढळून आले आहे. हा चार्ज अनेकदा चॅरिटी कॉन्ट्रिब्युशन, स्टॉफ वेलफेअर फंड किंवा स्टॉफ कॉन्ट्रिब्युशन अशा वेगवेगळ्या नावांनी दाखवला जातो. त्यामुळे ग्राहकांची सर्रास लूट करणाऱ्या अशा रेस्टॉरंट्सवर कडक कारवाई करा, अशी मागणी मुंबई ग्राहक पंचायतीने केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाकडे (सीसीपीए) केली आहे.

मुंबईत अनेक रेस्टॉरंट्सकडून सेवा शुल्काच्या नावाखाली ग्राहकांची लूट केली जात आहे. विविध नावांनी हे शुल्क ग्राहकांच्या नकळत आकारले जाते. काही रेस्टॉरंट्समध्ये तर ' ही सेवा कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छेने दिली जाणारी १० टक्के टिप आहे. जर ती काढून टाकायची असेल तर वेटरला तसे सांगा' असे मेन्युकार्डावर सूचित केले जाते. मात्र ही सूचना अतिशय बारीक अक्षरात, सहजासहजी न दिसेल आणि न वाचता येईल अशा पध्दतीनेच छापलेली असल्याने ग्राहकांच्या नजरेतून ती निसटते. काही ठिकाणी तर ५ ते १० टक्के सर्व्हिस चार्ज बिलामध्ये बिनदिक्कत दाखवला जातो.

**ग्राहकांनी या गोष्टी लक्षात ठेवाव्यात**

१) रेस्टॉरंट बिलामध्ये सर्व्हिस चार्ज समाविष्ट करू शकत नाही.
२) रेस्टॉरंटना ग्राहकाने टिप द्यावी की नाही हे ठरवण्याचा अधिकार नाही.
३) बिलामध्ये सर्व्हिस चार्ज लावल्याने त्यावर राज्य व केंद्रीय जीएसटीही लागू होतो.
४) ग्राहकांनी बिलामध्ये सर्व्हिस चार्ज आढळल्यास त्याला विरोध करावा.
५) टिप म्हणून सर्व्हिस चार्ज देणे हे पूर्णपणे स्वेच्छेचे आहे.
६) जबरदस्तीने चार्ज आकारला जात असेल तर पंचायतीला ९८९२३ ३५६१८ या क्रमांकावर कळवा किंवा राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन १९१५ वर तक्रार नोंदवा.

**सेवा शुल्क आकारणे बेकायदेशीर**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (सीसीपीए) ४ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व्हिस चार्ज कोणत्याही प्रकारे वा कोणत्याही नावाने आकारणे ही अनुचित व्यापारी पद्धती घोषित करून त्यावर स्पष्टपणे बंदी घातली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये दोन हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांची या मार्गदर्शक सूचनांना आव्हान देणारी अपिले फेटाळून लावत या मार्गदर्शक सूचनांना वैध ठरवले असून ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध सक्तीने सर्व्हिस चार्ज आकारणे हे अनुचित व्यापारी पद्धती असल्याचे नमूद केले आहे.

**पंचायतीच्या मागण्या**

मुंबई ग्राहक पंचायतीने केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या अध्यक्षांना तक्रारपत्र पाठवून काही रेस्टॉरंट्सची बिले व मेन्यूकार्ड्स जोडून काही मागण्या केल्या आहेत. यात संबंधित रेस्टॉरंट्सवर कठोर कारवाई करून त्यांना रोखावे, संबंधित रेस्टॉरंट्सच्या मागील तीन आर्थिक वर्षांचे रेकॉर्ड तपासून त्यांनी सर्व्हिस चार्ज किंवा तत्सम नावाने किती रक्कम गोळा केली आहे ते शोधून ती रक्कम दंडात्मक व्याजासह केंद्रीय ग्राहक कल्याण निधीत जमा करण्याचे निर्देश द्यावेत, सक्तीचे सर्व्हिस चार्ज बेकायदेशीर असल्याचे पुन्हा एकदा जाहीर करून त्याला ठळक प्रसिध्दी द्यावी, सर्व्हिस चार्ज देणे हे सक्तीचे नसून तो देणे हा ग्राहकांच्या पूर्णपणे स्वेच्छेवर अवलंबून आहे, हे ठळकपणे दाखवणे रेस्टॉरंटवर बंधनकारक करावे.

# नवी मुंबईमध्ये भंगार धंद्याच्या नावाखाली रेल्वे रुळांच्या बाजूला सुरु होते ड्रग्जचे रॅकेट

## अखेर पोलिसांनी अशी केली कारवाई



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

भंगार विक्रीच्या व्यवसायाच्या नावाखाली अंमली पदार्थाचा रॅकेट चालवणाऱ्या एका टोळीचा नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अड्डा उद्धवस्थ केला आहे. अंमलीपदार्थ विरोधी पथकाने नेरुळ रेल्वे पटरी लगत असलेल्या झोपडीवर धाड टाकून तब्बल २२ लाख रुपयांच्या किंमतीचे हेरॉईन आणि गांजा जप्त केला आहे.तसेच या तस्करीत सहभागी असलेल्या सात आरोपींना अटक करण्याच आली आहे.

अमली पदार्थ विरोधी पथकाने नेरुळ रेल्वे पटरी लगत असलेल्या झोपडीवर धाड टाकून तब्बल २२ लाख रुपये किंमतीचे हिरोईन आणि गांजा जप्त केला आहे. तसेच या तस्करीत सहभागी असलेल्या सात आरोपींना अटक केली आहे. नेरुळ सेक्टर २८ मधील रेल्वे पटरी जवळ राजू राठोड नावाचा व्यक्ती आपल्या नातेवाईकांच्या मदतीने भंगार विक्रीच्या नावाखाली अमली पदार्थ विकत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या नेतृत्वाखाली ४ पोलीस अधिकारी आणि १५ पोलीस अंमलदारांच्या पथकाने बुधवारी दुपारी १२.३० च्या सुमारास नेरुळ सेक्टर - २८ मधील रेल्वे रुळालगतच्या संशयीत झोपडीवर छापा टाकला.

यावेळी पोलिसांनी केलेल्या तपासणीत सदर झोपडीत तब्बल २२ लाख रुपये किंमतीचे ४३.६ ग्रॅम हिरोईन तसेच २६ ग्रॅम गांजा आढळुन आला. पोलिसांनी सदरचा गांजा जप्त करुन अमली पदार्थाच्या तस्करीत सहभागी असलेल्या राकेश सचिन वाघरी (१८), राजेंद्र भीमा काळे (५५), अनिता संजय पवार (२९), राजू बाबू राठोड (२८), शिवराम लक्ष्मण पवार (३२), कमळाबाई बाबु राठोड (५५), सुमन राजू राठोड (२५) या ७ जणांना ताब्यात घेऊन असून त्यांच्यावर नेरुळ पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**भंगार दुकान अनधिकृत जागेत**

अटकेत असलेला मुख्य आरोपी राजू राठोड हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी नेरुळ पोलीस ठाण्यात मारहाण आणि चोरी आणि घरफोडी यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपी राजू राठोड याचे भंगार दुकान अनधिकृत जागेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हे अनधिकृत बांधकाम तातडीने तोडण्यासाठी पोलीस प्रशासनाने नवी मुंबई महानगरपालिकेशी पत्रव्यवहार केला आहे. या प्रकरणातील अन्य दोन आरोपी विशाल आणि गंगा काळे या दोघांचा पोलीस शोध घेत आहेत.

# अनैतिक संबंधाच्या वादातून एका १८ वर्षीय युवकाची हत्या

## हात-पाय घट्ट धरले, गळा चिरला, तरुणाच्या शरीरावर ३५ वार केले

■मुंबई। प्रतिनिधी,

अनैतिक संबंधाच्या वादातून एका १८ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन सख्ख्या भावांना अटक केली असून, मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. मुख्य आरोपीच्या पत्नीसोबत या तरुणाचे अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. त्याच संशयातून या तरुणावर ३५ वार करुन निर्घृणपणे संपवण्यात आले. अभिषेक असं हत्या झालेल्या तरुणाचं नाव आहे. उत्तर प्रदेशातील गोरखपूरमधील ही घटना आहे.



**मृतदेह सापडल्यानंतर खळबळ**

अभिषेकची हत्या ६ फेब्रुवारीच्या रात्री अत्यंत क्रूरपणे करण्यात आली होती. ७ फेब्रुवारीला त्याचा रक्ताने माखलेला मृतदेह सापडल्यानंतर परिसरात खळबळ उडाली होती. पोस्ट मार्टम अहवालात अभिषेकच्या शरीरावर धारदार शस्त्राने तब्बल ३५ वेळा वार करण्यात आल्याचे समोर आले. सुरुवातीला हे प्रकरण जुन्या वादातून झाल्याचे वाटत होते, मात्र पोलीस तपासात आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे प्रेमसंबंधाचा आणि संशयाचा अँगल समोर आला. धुक्यामुळे सुरुवातीचे फुटेज अस्पष्ट होते, पण मद्याच्या दुकानाबाहेरील कॅमेऱ्यांनी पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळवून दिले.

### अनैतिक संबंधांचा संशय

तपासादरम्यान समोर आले की, मुख्य आरोपीला अभिषेकचे आपल्या पत्नीसोबत अवैध संबंध असल्याचा संशय होता. याच रागातून त्याने हत्येचा कट रचला. घटनेच्या रात्री आरोपींनी अभिषेकला पार्टीच्या बहाण्याने पेवनपुर गावाजवळ नेले. तिथे सर्वांनी मिळून मद्यप्राशन केले. अभिषेक नशेच्या धुंदीत असताना, दोन्ही कामगार भावांनी त्याचे हात-पाय घट्ट पकडले आणि मुख्य आरोपीने चाकूने त्याचा गळा चिरून शरीरावर अनेक वार करत त्याची हत्या केली. त्यानंतर आरोपी त्याचा मोबाईल आणि इतर सामान घेऊन पसार झाले.

### मुख्य आरोपी फरार

पोलिसांनी पवन आणि विजय या दोन्ही भावांना न्यायालयात हजर केले असता, त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. पोलीस आता फरार मुख्य आरोपीचा कसून शोध घेत आहेत. एसपी नॉर्थ ज्ञानेंद्र कुमार यांनी सांगितले की, तांत्रिक पुरावे आणि सर्व्हिलन्सच्या मदतीने हा गुन्हा उघडकीस आला आहे. एका तरुणाची ३५ वार करून केलेली ही निर्घृण हत्या गोरखपूरमध्ये चचेर्चा विषय ठरली आहे.


# गेल्या वर्षी डबल अन् आता ट्रिपल मर्डर

## पैशाचा पाऊस पाडणारा तांत्रिक 'असा' अडकला पोलिसांच्या जाळ्यात

■मुंबई । प्रतिनिधी,

पैशाचा पाऊस पाडण्याचं अमिष दाखवून एका ७२ वर्षीय मांत्रिकाने तिघांची हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. दिल्लीच्या पीरागढी भागातील ही घटना आहे. दिल्लीतील पश्चिम विहार ईस्ट पोलिसांना एका कारमध्ये तीन मृतदेह आढळून आले होते. सुरुवातीला पोलिसांना हा अपघात वाटला होता. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवली आणि सगळं सत्य समोर आलं. नेमकं काय घडलं, जाणून घेऊया.

रविवारी (८ फेब्रुवारी) पश्चिम विहार ईस्ट पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका कारमध्ये रणधीर, शिव नरेश आणि लक्ष्मी या तिघांचे मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळले होते. या घटनेमुळे संपूर्ण दिल्लीत खळबळ उडाली होती. डीसीपी सचिन शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी या ठिकाणाहून परतत असताना आरोपी कमरुद्दीनने या तिघांना तंत्र-मंत्राचा भाग म्हणून काही पदार्थ खायला दिले होते. प्रत्यक्षात त्या लाडूंमध्ये विष कालवले होते, ज्यामुळे या तिघांचा जागीच मृत्यू झाला.



तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली आहे की, अटक करण्यात आलेला कमरुद्दीन हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा दाखल आहे. मे २०२५ मध्ये उत्तर प्रदेशातील फिरोझाबाद जिल्ह्यातील मक्खनपूर येथेही त्याने अशाच प्रकारे दोन जणांची हत्या केली होती. तिथेही त्याने जमिनीतील गाडलेले धन काढून देण्याचे आमिष दाखवून रामनाथ आणि पुरन नावाच्या व्यक्तींना विषारी पदार्थ देऊन संपवले होते. त्या प्रकरणात त्याला अलाहाबाद उच्च न्यायालयातून जामीन मिळाला होता.

# 'बायको मला निळ्या ड्रममध्ये घालून मारणार होती, त्याआधीच...' नवऱ्याची कबुली

■मुंबई। प्रतिनिधी,

'माझी पत्नी मला निळ्या ड्रममध्ये टाकून मारून टाकणार होती, तिने माझा काटा काढण्यापूर्वीच मी तिला वाटेतून हटवलं,' अशी धक्कादायक कबुली एका आरोपीने पोलिसांसमोर दिली आहे. उत्तर प्रदेशातील बरेली पोलिसांनी तब्बल १३ महिन्यांच्या तपासानंतर एका १६ वर्षीय मुलीच्या बेपत्ता प्रकरणाचा छडा लावला असता, २०१७ मध्ये झालेल्या एका महिलेच्या खुनाचाही उलगडा झाला. या प्रकरणी पोलिसांनी सलीम हुसेन आणि आसिम उर्फ डॉ. बंगाली या दोन आरोपींना अटक केली असून, हे दोघेही पश्चिम बंगालला पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या.



**एका खूनाचा तपास करताना दुसऱ्याचा उलगडा**

सलीम हुसेनला पकडल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने सांगितले की, त्याने अल्पवयीन मुलीला रात्री उसाच्या शेतात बोलावून तिचा गळा आवळून खून केला आणि तिचा फोन नदीत फेकून दिला. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे सलीमचा साथीदार 'डॉ. बंगाली' याने २०१७मध्ये आपल्या पत्नीचा, रजनीचाही सलीमच्या मदतीने खून केल्याचे कबूल केले. डॉ. बंगालीने सांगितले की, त्याचे पत्नीसोबत वारंवार वाद होत होते. पत्नी आपली हत्या करेल या भीतीने त्याने तिचा गळा दाबून खून केला आणि मृतदेह पुरून टाकला.

### शेतात आढळली मानवी हाडे

या प्रकरणाची सुरुवात ८ जानेवारी २०२५ रोजी झाली, जेव्हा सतवन पट्टी येथील अजीज अहमद यांनी आपली १६ वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. तपासादरम्यान सप्टेंबर २०२५ मध्ये कैलाश नदीकाठी एका उसाच्या शेतात मानवी हाडे, कपडे आणि केसांची वेणी सापडली. डीएनए चाचणीत ती हाडे अजीज यांच्या मुलीचीच असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी जेव्हा मोबाइल लोकेशन आणि सीडीआर तपासला, तेव्हा गावातील सलीम हुसेनची भूमिका संशयास्पद आढळली. सलीमचा पॉलिग्राफ टेस्ट करण्याचा निर्णय घेताच तो फरार झाला, ज्यामुळे पोलिसांचा संशय बळावला.

### १३ महिन्यांनंतर हत्येचा छडा

डॉ. बंगाली हा मूळचा पश्चिम बंगालचा असून त्याने आरएमपी डिप्लोमा केला आहे. त्याने पोलिसांना सांगितले की, त्याची आणि पत्नीची भेट २००६ मध्ये दिल्लीत झाली होती. आरोपी सलीमवर यापूर्वीच लूटमार आणि हत्येच्या प्रयत्नासारखे अनेक गुन्हे दाखल आहेत. १३ महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर पोलिसांनी या दोन्ही खुनांचा छडा लावत गुन्हेगारांना तुरुंगात धाडले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून 'निळ्या ड्रम'मधील हत्येच्या भीतीची चर्चा रंगली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com